
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ७
www.ramprahar.com
गुरुवार २४ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ‘मासेमारी बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढवा’



**मुंबई :** मासेमारी बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढवा, अशी मागणी महाराष्ट्र आणि गुजरातच्या मच्छिमारांनी केली आहे. याबाबत मच्छिमारांनी बुधवारी (दि. २३) मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे यांची भेट घेतली. इंडियन वेस्ट कोस्ट फिशरमेन फेडरेशनमधील महाराष्ट्र व गुजरातच्या शिष्टमंडळाने मंत्री राणे यांची मंत्रालयात भेट घेतली. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात वादळी वारे वाहतात, ज्यामुळे समुद्र खवळलेला असतो. परिणामी मच्छिमारांची जीवितहानी तसेच नौकांचे नुकसान होण्याची शक्यता बळावते. त्याचप्रमाणे १५ ऑगस्टपर्यंत बंदी केल्यास शाश्वत मासेमारीला चालना मिळून मासळी साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. म्हणूनच पावसाळी मासेमारी बंदी कालावधी वाढवण्याची मागणी मच्छिमारांकडून करण्यात आली. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून निर्णय घेणार असल्याचे आश्वासन मंत्री राणे यांनी दिले.

**अंतरंग**
विवाहितेने लग्नास नकार दिल्याने पतीचा खून/२
अलिबागेतील सांबरकुंड धरणाचे काम लवकरच होणार सुरू/५
सुयश पवारची किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी निवड/८

# वाढदिवस देवाभाऊंचा, विक्रम महारक्तदानाचा!

## स्तुत्य उपक्रमाची एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने मंगळवारी राज्यभरात राबवण्यात आलेल्या महारक्तदान संकल्प या विक्रमी उपक्रमाची मानाच्या एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. दरम्यान, हा विश्वविक्रम आपण सर्वांनी एकजुटीने रचला हे सांगताना अतिशय आनंद होतो, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी म्हटले आहे.

मान्सूनच्या काळात रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण होतो. याच सामाजिक जाणिवेतून महारक्तदानाचा उपक्रम राबवण्यात आला. त्यामुळे सेवा ही संघटन या भाजप मूलमंत्रानुसार झालेले विक्रमी रक्तदान विशेष महत्त्वाचे आहे.

सामाजिक बांधिलकी जपत देवाभाऊंना



वाढदिवसानिमित्त शुभाशीर्वाद देण्यासाठी आयोजित या उपक्रमाला उदंड प्रतिसाद लाभला. राज्यातील १,०८८ ठिकाणी झालेल्या महारक्तदान संकल्प उपक्रमात एकूण ७८,३१३ बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. एकाच दिवशी सर्वाधिक ठिकाणी राबवण्यात आलेले रक्तदान शिबिर आणि सर्वाधिक रक्त संकलित करणे असे दोन्ही विक्रम या उपक्रमातून रचले गेलेत.

उपक्रमात सहभागी होत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे तसेच हा उपक्रम यशस्वी करण्यामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या भाजप परिवारातील सर्व जिल्हाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे.

प्रदेश कार्यालयात झालेल्या प्रमाणपत्र प्रदान सोहळ्याला एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे वरिष्ठ परीक्षक संजय भोला आणि सीमा मनीकोट यांच्यासह प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार जयप्रकाश ठाकूर, प्रदेश महामंत्री आमदार विक्रांत पाटील, महामंत्री राजेश पांडे, माधवी नाईक, विजय चौधरी, रवी अनासपुरे, माध्यम प्रमुख नवनाथ बन आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाने पुन्हा एकदा जोर धरला आहे. मंगळवार संध्याकाळपासून सुरू असलेल्या पावसाने जिल्ह्याला झोडपून काढले. जिल्ह्यात बुधवारी (दि. २३) सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये ९१ मिमीच्या सरासरीने पाऊस पडला. पुढील दोन दिवस जिल्ह्यासाठी पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे.

मागील आठवड्यात झालेल्या पावसाने रायगडकरांना जोरदार दणका दिला होता. त्यानंतर पावसाचा जोर कमी झाला. ढगाळ वातावरण होते, मात्र पावसाचा जोर नव्हता. मंगळवारी दुपारनंतर पावसाचा जोर वाढला. रात्रीच्या सुमारास उत्तर भागात पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. सकाळपासून पावसाची रिपरिप सुरू होती, दुपारी पुन्हा जोर वाढला. या पावसामुळे रस्त्यावर पाणीच पाणी झाले. सखल भागात पाणी साचले होते. नद्यांच्या पाणीपातळीत काहीशी वाढ झाली असली तरी इशारा पातळीपेक्षा कमी होती. मुरूड, पेण, रोहा, माणगाव, तळा, श्रीवर्धन आणि म्हसळा या सात तालुक्यांमध्ये १०० मिलीमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे.

### दोन दिवस रेड अलर्ट

हवामान खात्याने रायगड जिल्ह्याला गुरुवार



(दि. २४) आणि शुक्रवार (दि. २५) असे दोन दिवस पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. त्यामुळे रायगड जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचे आदेश दिले आहेत, तर या पार्श्वभूमीवर आपत्ती काळात मदत करणाऱ्या सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**पावसाची तालुकानिहाय आकडेवारी** (मिलीमीटरमध्ये)

अलिबाग ९६, मुरूड १२४, पेण १२०, पनवेल ४८.८, उरण ७४, कर्जत ३०.२, खालापूर ५०, माथेरान ५४, रोहा १५९, सुधागड ८६, माणगाव ११५, तळा १५०, महाड ५६, पोलादपूर ६८, श्रीवर्धन ११६, म्हसळा १०९, एकूण १४५६, सरासरी ९१.

# महाडमध्ये एसटी बसचा अपघात; १० जण जखमी

**महाड : प्रतिनिधी**

पुणे-फौजी अंबवडे एसटी बस बुधवारी (दि. २३) महाड तालुक्यातील मांडवकर कोंड गाव हद्दीत एका निसरड्या रस्त्यावर घसरली. या अपघातात बसमधील १० जण जखमी झाले आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार पुणे-फौजी अंबवडे एसटी बस (एमएच ०७ सी ९०४३) बस महाड-दापोली राज्य मार्गावरून मांडवकर कोंडीच्या हद्दीत आली असता निसरड्या रस्त्यावरून चालकाचा बसवरून ताबा सुटला आणि बस रस्त्याच्या



कडेला घसरली.

या अपघातात चालक अविनाश पांडुरंग लोखंडे (वय ३४, रा. पिंपरी चिंचवड), वाहक पौर्णिमा प्रमोद होन कडसे (४६, पुणे), आशाबाई नारायण जाधव (७५, फौजी अंबवडे), शारदा गजानन शेलार (६७, फौजी अंबवडे), सोहम ज्ञानेश्वर पवार (१७, फौजी अंबवडे), सिमाब सिकंदर पेडेकर (१६, शिरवली), सलवा अब्दुल सलाम पेडेकर (१७, शिरवली), आराधना दिगंबर पवार (१८, फौजी अंबवडे), लहू सखाराम पाते (५५, पांगरी), विश्वजीत सोपान कदम (२७, शिरवली) असे एकूण १० जण जखमी झाले आहेत. जखमींवर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



**नवी मुंबई : पनवेल तालुक्यातील विचुंबे आणि शिवकर गावातील पाणी प्रश्नाबाबत नवी मुंबई महापालिकेतील आयुक्त दालनात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत विचुंबे गावाला वाढीव नळजोडणी व पाणीपुरवठा मिळावा ही मागणी करण्यात आली. यावर सकारात्मकता दाखवत लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लागेल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली. या बैठकीला विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकर सरपंच आनंद ढवळे, देवदचे विनोद वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## निवडक

### ‘अल-कायदा’शी संबंधित चार दहशतवाद्यांना अटक

**नवी दिल्ली :** गुजरात दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) अल-कायदा संघटनेशी संबंधित चार संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. दोघांना गुजरातमधून, एका दिल्लीतून आणि एका दहशतवाद्याला नोएडामधून अटक करण्यात असून, सध्या त्यांची कसून चौकशी केली जात आहे, अशी माहिती एटीएसचे डीआयजी सुनील जोश यांनी दिली. येत्या काळात या प्रकरणात आणखी खुलासे आणि अटक होऊ शकतात.

### पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूरवर २८, २९ जुलैला संसदेत चर्चा

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ऑपरेशन सिंदूर, पहलगाम दहशतवादी हल्ला या मुद्द्यांवर सभागृहात चर्चा करण्याची मागणी विरोधी पक्षांकडून करण्यात येत होती. सरकारने त्यास सहमती दर्शविली आहे. पुढील आठवड्यात सोमवारी (२८ जुलै) लोकसभेत आणि मंगळवारी (२९ जुलै) राज्यसभेत या मुद्द्यांवर चर्चा होईल. पंतप्रधान मोदी २९ जुलै रोजी या विषयावर राज्यसभेत भाषण करतील.

# मुंबईतील मोठ्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाचा मार्ग होणार मोकळा

## ■ राज्य सरकारकडून हायकोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल राखत विशिष्ट उंचीच्या घरगुती गणेशमूर्ती कृत्रिम तलावात, तर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मोठ्या मूर्ती या परंपरागत समुद्रात विसर्जन करण्यात येतील. त्यासाठी पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे प्रतिज्ञापत्र बुधवारी (दि. २३) राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात सादर केले. त्यामुळे मोठ्या गणेशमूर्ती समुद्रात विसर्जन करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

पीओपीवरील बंदीमुळे लाखो मूर्तिकारांचा रोजगार बुडून या एका मोठ्या उद्योगाचे अर्थकारण अडचणीत येऊ नये म्हणून राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोगाला अभ्यास करण्याची विनंती केली होती. या आयोगाने डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट स्थापन करून पीओपी व त्यामुळे पर्यावरणावर होणारे परिणाम याचा अभ्यास करून काही शिफारशी व सूचना शासनाला केल्या. हा अहवाल केंद्रीय पर्यावरण विभागाने न्यायालयात मांडल्यानंतर हायकोर्टाने पीओपी वापरावरील घालण्यात आलेली बंदी उठवली, तर मोठ्या गणेशमूर्ती कुठे विसर्जन करणार याबाबत राज्य शासनाला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते.

शासनाने अभ्यास करून बुधवारी मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी या वेळी सरकारचे धोरण सादर केले. न्यायालयाने सरकारची भूमिका ऐकून घेतली. यावर गुरुवारी पुन्हा सुनावणी होणार आहे.

### पर्यावरणाचा समतोल साधला जाणार

पर्यावरणीय समतोल लक्षात घेऊन मर्यादित उंचीच्या सर्वात जास्त संख्या असलेल्या घरगुती व लहान मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच राहणार आहे. मुंबईच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची शंभर वर्षांहून अधिक मोठी परंपरा असून त्यामध्ये बाधा न आणता उत्सव व गणेशमूर्ती विसर्जन ही संपूर्ण परंपरा अखंड राहील आणि पर्यावरणाच्या दृष्टीने जागृत राहून काही उपाययोजनाही केल्या जातील, अशी भूमिका शासनाने घेतलीय.

# रायगडातील ३४७ शाळाबाह्य, स्थलांतरित मुले शिक्षणाच्या प्रवाहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य तसेच स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची विशेष शोधमोहीम १ ते १५ जुलैदरम्यान राबविण्यात आली. या मोहिमेत १४३ शाळाबाह्य तसेच २०४ स्थलांतरित मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यात प्राथमिक समग्र शिक्षा कार्यक्रमाची तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ज्ञानरचनावादी शाळा, कृतीयुक्त अध्ययन पद्धती, डिजिटल शाळा, आयएसओ मानांकन, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती परीक्षा तयारी, नवोदय परीक्षा तयारी अशा प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांमार्फत शाळांमध्ये सुरू आहे. शासनाच्या अनेक योजना सुरू असतानाही अद्याप काही बालके शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहेत. अशा बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणेसाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता शाळाबाह्य तसेच स्थलांतरित मुलांची शोधमोहीम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहितुले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

या मोहिमेत घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्याव्यतिरिक्त बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंबे, जिल्ह्यातील सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षणगृह, विशेष दत्तक संस्था आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य, स्थलांतरित विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला.

या शोधमोहिमेत ७७ मुले, ६६ मुली अशी एकूण १४३ शाळाबाह्य मुले सापडली असून या सर्व मुलांना जवळच्या जिल्हा परिषद शाळेत प्रवेश देण्यात आला आहे तसेच इतर जिल्ह्यातून रायगडात स्थलांतरित होऊन आलेले १०५ मुले व ९९ मुली अशा २०४ मुलांनाही शाळेत दाखल करून घेण्यात असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली.

# एक हजार आदिवासी जोडपी लग्नबंधनात

## अलिबागमध्ये सामूहिक विवाह सोहळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पांडवादेवी येथे आदिवासी जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात एक हजार आदिवासी जोडपी लग्नबंधनात अडकली. मुलनिवासी आदिवासी कातकरी समाज विकास सेवा संस्थेने या उपक्रमाचे आयोजन केले होते.

आदिवासी समाजाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासन विविध उपक्रम राबवत असते. शासनाच्या या उपक्रमाला हातभार लावण्यासाठी मुलनिवासी आदिवासी कातकरी समाज विकास सेवा संस्थेने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या उपक्रमाला आदिम उन्नत सेवा संघ तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाला हरिद्वार येथील डॉ. भगवती नंदा आखाड्याच्या महामंडलेश्वर उपस्थित होत्या. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. विवाह सोहळ्यावर



होणारा खर्च कमी करून संस्थेने हा उपक्रम राबवला. आदिवासी जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा प्रेरणादायी आहे. अशा प्रकारचे उपक्रम समाजात राबवणे गरजेचे असून आदिवासी विकास विभागाने अशा उपक्रमाला प्रोत्साहन द्यायला हवे. त्याचबरोबर शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यायला हवा, असे त्यांनी सांगितले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ईश्वर नाईक यांनी सांगितले की, हा उपक्रम राबवण्यासाठी आम्ही मागील दोन वर्षांपासून पाठपुरावा करीत आहोत. समाजातील विविध स्तरातून मिळालेल्या सहकार्यामुळे आम्ही हा उपक्रम यशस्वी करू शकलो. संपूर्ण जिल्ह्यातून एक हजार आदिवासी जोडप्यांची निवड करून आम्ही त्यांना एकत्र आणणे हे मोठे काम होते, परंतु संस्थेच्या सदस्यांनी मेहनत घेऊन हे काम यशस्वी केले.

या वेळी जुनागडचे हनुमानदास महाराज, काजशीमहाराज वाघुल, एकनाथमहाराज पवार, हेमंतगिरीमहाराज, पद्माकरमहाराज म्हात्रे आदी साधू, महंतांनी आवर्जून उपस्थिती लावत नवविवाहित जोडप्यांना शुभाशीर्वाद दिले.

या कार्यक्रमाला एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे आनंद पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अमित नाईक, भाजपचे ॲड. आस्वाद पाटील, रायगड जिल्हा आदिवासी कातकरी समाज संघटनेचे संतोष वाघमारे, केतन वाघमारे, संखाराम पवार, दिलीप कदम, नारायण लोभी, कांता वाघमारे, महेश वाघमारे उपस्थित होते. सर्वांनी नवदाम्पत्यांना शुभेच्छा दिल्या.

## पूजा खेडकरचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र रद्द

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) बडतर्फ प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर हिचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने घेतला आहे. या संदर्भातील अहवाल राज्य शासनाला सादर करण्यात आला आहे.

कोट्यवधींची संपत्ती व महागडी वाहने असताना पूजा खेडकरने दिशाभूल करून नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र मिळवले होते. त्यामुळे नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने पूजाला ‘नॉन क्रिमिलेअर’ प्रमाणपत्र रद्द का करू नये, अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मागील काही महिन्यांपासून यावर सुनावणी सुरू होती.

## ‘गटारी’निमित्त मटण-चिकन शॉपवर उसळली खवय्यांची गर्दी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

गटारी अमावस्येनिमित्त विविध ठिकाणच्या मटण व चिकन दुकानांमध्ये बुधवारी (दि. २३) सकाळपासूनच प्रचंड गर्दी पहायला मिळाली. श्रावणातील आगमनापूर्वीचा हा शेवटचा चविष्ट दिवस असल्यामुळे अनेकांनी मनसोक्त मांसाहाराचा आनंद घेतला.

सकाळी ६ वाजल्यापासूनच बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी गर्दी होऊ लागली होती. १०च्या सुमारास ही गर्दी शिगेला पोहचली. या वेळी चिकनचा दर १७० रुपये किलो, तर मटण तब्बल ८०० रुपये किलोवर गेला होता. दरवाढ असूनही ग्राहकांची खरेदी थांबली नाही. काहींनी पूर्वनियोजन करत बुकिंग करून ठेवले होते, तर काही जण दुकानांपुढे रांगेत उभे राहून चिकन-मटण मिळवण्यासाठी उत्सुक दिसले.

बाजारपेठा गजबजून गेल्या होत्या. मच्छीविक्रेत्यांच्या दुकानांवरदेखील तुडुंब गर्दी पहायला मिळाली. स्थानिक हॉटेल्स, खानावळी आणि स्टॉल्सवर मांसाहारी मेजवानीसाठी खवय्यांची झुंबड उडाल्याचे चित्र होते.

एकूणच जिल्ह्यातील नागरिकांनी उत्साहात, आनंदात आणि भरगच्च मेजवानीसह गटारी अमावस्या साजरी केली.

## निवडक

### लोकमान्य टिळकांना अभिवादन



**पनवेल :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान क्रांतिकारक, थोर समाजसेवक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्ताने पनवेल महापालिकेच्यावतीने मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी अतिरीक्त आयुक्त कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ.वैभव विधाते, अभिषेक पराडकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सचिव अक्षय कदम, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### लोकमान्य टिळक यांची जयंती



**पनवेल :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्त पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे लोकमान्य टिळक यांच्या फोटो प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. या वेळी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह सर्व पोलीस स्टाफ उपस्थित होता.



**पनवेल : तालुक्यातील उसर्ली बुद्रूक येथील मयुर संतोष दळवी यांनी डेटा इंजिनिअरमध्ये सुयश प्राप्त केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, संतोष दळवी आदींनी अभिनंदन केले.**

# कामोठे येथे 'रयत'च्या मुख्याध्यापकांची सविचार सभा



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी व शाखाप्रमुख भूमिका या विषयावर रायगड विभागीय कार्यशाळा रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभाग प्राचार्य व मुख्याध्यापक कार्यशाळा सोमवारी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत व रायगड विभागीय चेअरमन माजी आमदार बाळाराम पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राचार्य व मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी सातारा येथून माहिती अधिकारी व नवीन शैक्षणिक धोरण तज्ञ शिवाजी राऊत यांनी नवीन शैक्षणिक धोरण व माहिती अधिकार या वर दोन सत्रात प्रभावी मार्गदर्शन करून प्रशासकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे निराकरण केले.रयत शिक्षण संस्थेचे कायदा अधिकारी विनोद गोडगे यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले.

या वेळी विभागीय चेअरमन यांनी गुणवत्ता वाढ आणि शिक्षण धोरण यावर मार्गदर्शन करून सर्व सेवकांचे पाठीशी रयत शिक्षण संस्था व आम्ही पदाधिकारी असून सर्व शाळा इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्ड युक्त लवकरच होतील असा विश्वास प्रकट केला. मान्यवरांचे हस्ते नवोदित प्राचार्य व मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला. विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेची ध्येयधोरणे व गुणवत्ता या बाबत विचार प्रकट केले.

संस्था मॅनेजिग कौन्सिल सदस्या ठाकूर मॅडम, लाईफमेंबर कोळी, लाईफ वर्कर महेश पाटील, वाशी कॉलेज प्राचार्या नायक मॅडम, वीर वाजेकर कॉलेज प्रभारी प्राचार्य आमोद ठक्कर व विभागातील आश्रम शाळांचे माध्यमिक शाळांचे मुख्याद्यापक उपस्थित होते. मुख्याद्यापक डी. सी.पाटील यांनी उत्तम सुत्रसंचालन तर सहाय्यक विभागीय अधिकारी जगताप यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमातून जेई, नीट, स्पर्धा परीक्षाची मांडणी केली गेली. रायगड विभागीय कार्यालयीन सेवकांचे या प्रसंगी मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचीही उपस्थिती मोलाची होती. एकंदरीत अत्यंत उत्साहात व उत्तम प्रतिसादात कार्यशाळा झाली.

# कामोठे येथे रक्तदान शिबिराला प्रतिसाद

## मान्यवरांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करत असले तरी कार्यकर्ते त्यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करतात. यावर्षी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या आवाहनानुसार विक्रमी रक्तदान करून देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने कामोठे येथील आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयात मंगळवारी विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबीराला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानीत केले. या वेळी भाजपचे ज्येष्ठनेते जे.एम.म्हात्रे, माजी नगरसेवक डॉक्टर अरुणकुमार भगत, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, माजी शहर अध्यक्ष रवी जोशी, प्रदीप भगत, हर्षवर्धन पाटील, युवामोर्चाचे कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपा महाराष्ट्र प्रदेश महासचिव आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी मंगळवारी कामोठे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिराला पनवेल कामोठे परिसरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला असून आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार विक्रांत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना रक्तदान करून शुभेच्छा देणाऱ्या नागरिकांचे आभार मानले तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनीही या उपक्रमाचे कौतुक करून रक्तदान करून देशप्रेम करणाऱ्या रक्तदात्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, माजी नगरसेवक ऍडव्होकेट मनोज भुजबळ, गणेश कडू, रवी जोशी, हर्षवर्धन पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



# रामशेठ ठाकूर विद्यालयात निबंध स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त खारघर येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात आणि नवीन पनवेल येथील सीकेटी ज्युनियर कॉलेजमध्ये निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे नियोजन संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर तथा भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.



खारघर येथील विद्यालयात झालेल्या स्पर्धेत १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तर सीकेटी ज्युनियर कॉलेजमध्ये आयोजित स्पर्धेत ५६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या वेळी प्रभाकर जोशी, दिनेश खानावकर, डॉ. आगलावे, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर आणि सीकेटी ज्युनियर कॉलेजचे मुख्याध्यापक प्रशांत मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात या स्पर्धेत भाग घेऊन आपले विचार निबंधाच्या स्वरूपात मांडले. या निबंध स्पर्धेचा मुख्य हेतु विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल मुलांना माहिती होणे हा होता.

# उरण येथे भव्य रक्तदान शिबिर

## ७८ जणांचा सहभाग

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उरण येथे भव्य रक्तदान शिबिर मंगळवारी (दि.२२) सरस्वती मंडप, उरण एज्युकेशन सोसायटीचे मॅनेजमेंट आणि टेक्नोलॉजी महाविद्यालय, पालक मैदान उरण येथे आयोजित करण्यात आले.

रक्तदान शिबिर कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालय उरण, राष्ट्रीय सेवा योजन व उरण एज्युकेशन सोसायटीचे मॅनेजमेंट आणि टेक्नोलॉजी महा विद्यालय उरण, यांच्या संयुक्त विद्यमाने व उरण भाजप च्यासहकार्याने भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या वेळी महाराष्ट्र राज्य परिषद् सदस्य रवी भोईर, उरण नगरपरिषद माजी नगराध्यक्षा सायली भोईर, माजी नगरसेवक तथा भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, भाजप उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, चंद्रकांत घरत, सुधीर घरत, पंडित घरत, माजी जि.प.सदस्य विजय भोईर, भाजप ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, निखील माळी, विशाल पाटेकर, उरण तालुका संपर्क प्रमुख करण ठाकूर, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, बोकडवीरा बुध अध्यक्ष राज पाटील, जे.जे.हॉस्पिटल ब्लड बँक अधिकारी अमित सूर्यवंशी, युईएस, महाविद्यालय उरण प्राचार्य श्रीमती मीनाक्षी गुप्ता व कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालय उरण प्राचार्य वाल्मिकी गर्जे, कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयचे स्टाफ व विद्यार्थी, उरण एज्युकेशन सोसायटीचे मॅनेजमेंट आणि टेक्नोलॉजी महाविद्यालय कमिटी सदस्य, भाजप कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

दरम्यान, निता महेश बालदी यांनीही रक्तदान करून शिबिरात सहभाग घेतला.





# पनवेल तालुकास्तरीय विविध स्पर्धा




## अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाचे औचित्य साधून येत्या वर्ष भरात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून बुधवारी (दि.२३) पहिल्या स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान, इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांकरिता मातीपासून विविध वस्तू बनविणे ह्या पनवेल तालुका स्तरीय स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या जे.बी.एस.पी. संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्या अर्चना ठाकूर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले. तसेच स्पर्धे चे परीक्षक भारतभूषण पाटील यांच्या हस्ते नारळ वाढवण्यात आला.

मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सहाय्यक शिक्षक स्नेहल कडव यांच्या मार्गदर्शनाखाली सुंदरश्या नृत्याविष्काराने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ह्या स्पर्धेसाठी पनवेल तालुक्यातील तब्बल ४० शाळांनी सहभाग घेतला होता. दरम्यान ,विद्यार्थ्यांनी मातीला आकार देऊन एकापेक्षा एक सुंदर वस्तूं तयार केल्या.



या स्पर्धेचे परिक्षण भारतभूषण पाटील यांनी अगदी चोख पाहिले. दरम्यान ,त्यांनी विद्यार्थ्यांच्या चिमुकल्या हातांनी केलेल्या वस्तूंचे निरीक्षण करून विजेते क्रमांक घोषित करण्यात आले. सदर स्पर्धेत चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम विभागातील आदित्य दादा जाधव याने प्रथम क्रमांक, ब्राम्ही गणेश म्हात्रे ह्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर ह्या शाळेच्या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक तसेच हर्षिता वैभव केणी ह्या चांगू काना ठाकूर इंग्रजी माध्यम विद्यालयातील विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकाविला. दरम्यान, प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर यांनी विजेत्यांचे कौतुक करत उपस्थित शाळांचे शिक्षक आणि पालकांचे विशेष आभार मानले.

या स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी अर्चना ठाकूर, भारतभूषण पाटील, पालक शिक्षक संघाच्या प्रतिनिधी रेश्मा ढवळे, शाळेच्या, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होत्या. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सृजनशीलतेचा रंगोत्सव ; छत्री रंगभरण स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

म. ए. सो. आ. वा. ब. फडके विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागात मंगळवार, २२ जुलै २०२५ रोजी इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांनी आनंदात व उत्साहात छत्री रंगभरण उपक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी साध्या छत्र्यांना आपल्या कल्पकतेने आणि रंगीबेरंगी विचारांनी देखण्या कलाकृतींमध्ये रूपांतरित केले.



हा उपक्रम केवळ चित्रकलेपुरता मर्यादित नव्हता, तर विद्यार्थ्यांमध्ये एकता, सर्जनशीलता आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचा एक सुंदर प्रयत्न होता. या रंगमंचावर विद्यार्थ्यांनी आपली कल्पनाशक्ती, संघभावना आणि शिकण्याची ओढ या गोष्टी रंगांच्या माध्यमातून अत्यंत सुंदरपणे व्यक्त केल्या.

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे म.ए.सो.मातृसंस्थेच्या या ब्रीदवाक्यानुसार मुख्याध्यापिका मा. शीतल साळुंखे, कलाशिक्षक शशिकांत कुपटे तसेच इतर शिक्षकवर्गाने देखील या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

## संपादकीय

# जबाबदारीचे भान हवेच

एकीकडे राज्यात सरकारकडून विकासाचे भरीव काम सुरू असताना कुणाही नेत्याच्या बेजबाबदार वर्तनाने वा वक्तव्याने वातावरण गढुळावे हे निश्चितच योग्य म्हणता येणार नाही. अशा घटनांमुळे विरोधकांना आयतेच कोलित मिळते व त्यांच्याकडून सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला जातो.

**एक प्रगत तसेच सामाजिक, वैचारिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध राज्य अशीच महाराष्ट्राची प्रतिमा आजवर देशभरात राहिली आहे. महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातही कायम विशिष्ट असा सुसंस्कृतपणा देशाने पाहिला आहे. सामाजिक, राजकीय चळवळींचा इतिहास या राज्याला लाभलेला असलेला या राज्याने सुसंस्कृत राजकारण जोपासले आहे. या राज्यात विधिमंडळाकडे लोकशाहीचे एक पवित्र मंदिर म्हणून पाहिले गेले आहे. मात्र यंदाच्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात घडलेल्या काही घटनांनी राज्याने जपलेल्या राजकीय परंपरा, मूल्ये आणि सामाजिक भानाचे काहिसे उल्लंघन झाल्यासारखे चित्र निर्माण झाले. ज्या वास्तूमध्ये कायदे बनवले जातात, तिथे ते काम पार पाडण्याची मोठी जबाबदारी स्वीकारलेल्या व्यक्तींपैकी एकदोघांनी चुकीचे वर्तन केले तरी ते सर्वच राजकीय नेत्यांसाठी अडचणीचे ठरते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच याकडे लक्ष वेधले आहे. अशा घटनांमुळे कुणा एकाची अप्रतिष्ठा होत नाही तर सगळे आमदार माजले आहेत अशी भावना लोकांमध्ये निर्माण होते असे फडणवीस यापैकी एका घटनेच्या संदर्भात म्हणाले होते. आमदारांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांना विधिमंडळाच्या आवारात केलेली मारहाण असो, एका आमदाराने अशोभनीय पोशाखात उपहारगृहातील कर्मचाऱ्याला मारहाण करणे असो वा कुणी आमदार सभागृहात बसून रमी खेळत असल्याचा व्हिडिओ लोकांसमोर जाणे असो, या अशा घटना राज्यातील लोकप्रतिनिधींची प्रतिमा बिघडवणाऱ्या म्हणाव्या लागतील. अशा घटना समोर येण्याने निव्वळ सरकारला अडचणीचे ठरते असे नव्हे, तर सामाजिक-राजकीय चर्चेचा रोख महत्त्वाच्या प्रश्नांवरून भलतीकडे वळतो. विधानभवनात जेव्हा चर्चा सुरू असते तेव्हा आपले काम नसले तरी गांभीर्याने बसणे गरजेचे आहे. अशावेळी कुणी कागदपत्रे वाचतात, बाकीच्या गोष्टी वाचतात. पण रमी खेळतानाचा व्हिडिओ समोर येणे हे निश्चितच योग्य नाही असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. आपण रमी खेळत नसल्याचा खुलासा केला गेला आहे. अचानक रमीची जाहिरात समोर आली असे संबंधित आमदाराने म्हटले असले तरी हा सगळा प्रकार भूषणावह नाही अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. एखाद्या मंत्र्याने आपल्याच सरकारला भिकारी म्हणणे हेही अयोग्यच म्हणावे लागेल. पदासोबत आलेल्या जबाबदारीचे भान बाळगूनच संबंधितांनी विधाने करायला हवीत. सरकारचे कामकाज उत्तम सुरू असताना कुठल्यातरी फुटकळ विधानांनी माध्यमांवरची चर्चा व्यापली जाणे हे इतरांच्या कामकाजाच्या प्रयासांवर पाणी ओतणारे ठरते. सरकारमधील सगळ्यांनीच समयोचित विधाने करण्याचे भान बाळगायला हवे. अन्यथा विरोधकांना गोंधळाचे वातावरण निर्माण करण्याची संधी आयतीच मिळत राहील. राजकीय क्षेत्रातील जबाबदारीच्या पदांवरील व्यक्तींनी आचरणात विवेक बाळगला नाही तर ते समाजातील बऱ्या-वाईट गोष्टींबद्दल जनतेला मार्गदर्शन कसे करणार? आपल्या लहानमोठ्या कृतीतून खरे तर नीतीमत्तेचे दंडक निर्माण करून ते समाजापुढे ठेवण्याची जबाबदारी नेतेमंडळींकडे असते. काही मोजक्या नेत्यांना या जबाबदारीचा विसर पडला तरी जनतेपर्यंत विपरित संदेश जाऊ शकतो. राज्यातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातील सुसंस्कृतपणा जपण्याचे भान बाळगले जायलाच हवे.**

# दरडबंदीचे उपाय करण्याऐवजी घाटबंदी सुरू







पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाट आणि आंबेनळी घाट तसेच कुडपण घाट, चिपळूण खेडदरम्यानचा रघुवीर घाट आणि परशुराम घाट, महाड तालुक्यातील वरंध भोर घाट दरडी कोसळण्यावर प्रतिबंध न झाल्याने बंद होऊ घातले आहेत. दरडबंदीचे उपाय करण्याऐवजी महाड सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाने त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाने चालू कामातून भविष्यात नवीन कामे उदभवतील अशी तरतूद आणि आराखडे केल्याने पावसाळ्याला सुरूवात होताच घाट वाहतुकीस बंद ठेवण्याची आणि बंद ठेवलेल्या घाटातून दरडीचा मलबा हटविण्याची कामे करण्याची नामुष्की या विभागांसह प्रशासनावर येत आहे.

महाड तालुक्यातील वरंध घाट रूंदीकरणाच्या पार्वभूमीवर वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाट २०२१ मध्ये दरडग्रस्त होउन उदध्वस्त झाल्यानंतर अलिकडेच या घाटालाही रूंदीकरणाचे वेध लागले आहेत. मात्र, खेड तालुक्यातील कशेडी घाटामध्ये दरडीचे सत्र सुरू असले तरी भुयारी मार्गामध्ये एकेरी वाहतूक सुरू ठेवता येत आहे. पोलादपूर-वाई-सुरूर राज्यमार्ग क्र.४२ या रस्त्यापैकी रायगड जिल्ह्यातील साधारणत: २४.२००कि.मी. रस्ता पोलादपूर येथील नव्याने सुरू झालेल्या बांधकाम उपविभागाच्या अखत्यारीमध्ये असे. हा रस्ता आता महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या ताब्यात गेला आहे. या रस्त्याखेरिज, तालुक्यातील पैठण फाटा ते ओंबळी जिल्हाहद्द रस्त्याचे काम या बांधकाम उपविभागामार्फत सुरू झाले असून हा रस्ता १२ कि.मी.अंतराचा आहे. कशेडी घाटाला तालुक्यातच पर्यायी रस्ता म्हणून हा रस्ता भविष्यात विकसित करता येणे शक्य आहे. पोलादपूर, गोळेगणी, क्षेत्रपाळ ते कुडपण हा २६ कि.मी. अंतराचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोलादपूर उपविभागाकडे वर्ग झाल्यामुळे आंबेनळी घाटालाही भविष्यात पोलादपूर तालुक्यातच पर्याय निर्माण करण्यात आला आहे. काटेतळी ते नागांव रस्त्यामुळे महाड तालुक्यातील करंजाडीचे कोकण रेल्वे स्थानक तालुक्याला जोडले जाण्याची प्रक्रिया सुरू असून यापैकी ७ कि.मी.रस्ता पोलादपूर उपविभागाच्या अखत्यारीत आहे.

## खबरबात

**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता अतिवृष्टीमुळे रस्त्यांची धूप मोठया प्रमाणात होते. त्यामुळे रस्त्यावरील डांबर,खडी वाहून जाण्याचे प्रमाण वाढते, ही वस्तुस्थिती असली तरी दर्जा आणि गुणवत्ता नियंत्रणामुळे हा उपविभाग बंद करण्याची वेळ अद्याप शासनावर आली नाही. या उपविभागाकडे सर्वात कमी म्हणजे ६९.२००कि.मी. अंतराच्या रस्त्यांची देखभाल दुरूस्ती आणि बांधकाम असल्याने कामाचा दर्जा चांगला ठेवण्याकडे काटेकोरपणे लक्ष पुरविता येत असूनही केवळ अयोग्य अभियंते आणि चलाख ठेकेदारांमुळे या उपविभागामार्फत होणाऱ्या विकासकामांची वासलात लागली आहे. आता महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या ताब्यात पोलादपूर-वाई-सुरूर राज्यमार्ग क्र.४२ या रस्त्यापैकी रायगड जिल्ह्यातील साधारणत: २४.२००कि.मी. रस्ता गेल्यानंतर केवळ ४५ कि.मी. रस्त्याची कामे बांधकाम उपविभागाच्या अखत्यारीत आहेत. २०२१ मध्ये या आंबेनळी घाटरस्त्यावरील दरडी हटविण्याकामी ज्यांच्याकडे फावडे घमेल्यांसारखी अवजारेही नव्हती त्यांनी अक्षरश: लयलूट करीत कोटयवधीची बिले उपविभागाच्या डेप्युटी इंजिनियरला हाताशी धरून मिळवली.

पोलादपूर वाई सुरूर राज्यमार्ग क्र.४२ वर गेल्या काही वर्षांपासून अपघातांचे प्रमाण कमी झाल्याने आता मुंबई ते पोलादपूरमार्गे महाबळेश्वरपर्यंत पर्यटकांच्या वाहनांची रहदारी वाढली आहे. तरीही २०२१ या वर्षी पावसामुळे या घाटात दरडी कोसळून रस्त्यावर मोठमोठे दगड येण्यापर्यंतचे असंख्य प्रकार घडले आहेत. म्रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर शहर, कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीअंतर्गत रानबाजिरे, काटेवाडी, सिध्दार्थनगर,भराववाडी, कापडे कमानीचा परिसर तसेच आड, चांभारगणी, कुंभळवणे, पायटे, दाभिळटोंक पर्यंतच्या या २४.२००कि.मी.रस्त्याचे रूंदीकरण होण्याची शक्यता दिसून येत आहे. याबाबत महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनमार्फत कोणताही दुजोरा देण्यात आला नसला तरी आजमितीस रस्त्याची मोजणी व अन्य कामांना सुरू झाली आहे. आंबेनळी घाटातील ब्रिटीशकालीन पुलांना दोन्ही बाजुंनी काँक्रीटचे जॅकेट बांधून पुल टिकविण्याचा प्रयत्न झाला, दरीच्या बाजूने रुंदीकरण करण्यासाठी डोंगर उभे कापून मातीचा भराव करण्यात आला, मोठमोठी झाडे आणि अनेक वर्षांपासूनची झाडे तोडण्यात आली. देखभाल दुरूस्ती तसेच संरक्षक कठडे आणि डोंगरउताराच्या बाजूने रूंदीकरण, डांबरीकरण तसेच साईडपट्टयांचे मजबूतीकरण आदी कामे सातत्याने सुरू राहिली. २१ जुलै २०२१च्या अतिवृष्टीमुळे आंबेनळी घाट अनेक ठिकाणी दरडी कोसळून वाताहत झाल्यानंतर या रस्त्याच्या कायमस्वरूपी मजबूतीकरणासाठी महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या ताब्यात हा संपूर्ण आंबेनळी घाटरस्ता सोपविण्यात येऊन रायगड आणि सातारा बाजूने या रस्त्याच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे.

आंबेनळी घाटातून जात असून पायटा गावापासुन महाबळेश्वरकडे जाताना १ कि.मी. अंतरावर दरडप्रवण क्षेत्रात गुरूवारी दि.१० जुलै रोजी जोराचा पाऊस पडल्यामुळे डोंगरावरील दगड गोठे व माती रस्त्यावर आली. याठिकाणचे माती व दगड गोटे जेसीबीच्या सहाय्याने काढण्याचे काम कंत्राटदारांमार्फत प्राधान्याने चालू आहे. या दरडप्रवण क्षेत्रामध्ये अजून माती व दगड येण्याची शक्यता असून ते काढण्यास ४ ते ५ दिवस लागणार असल्याने पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे यांनी महाबळेश्वर तहसिलदार सचिन मस्के यांना दूरध्वनीद्वारे वाहतुकीसाठी महाबळेश्वर ते पोलादपूर रस्ता बंद ठेवण्याची सूचना केली. १४ जुलै रोजी आंबेनळी घाटातील वाहतुक सुरळीत होण्याची शक्यता निर्माण झाली असताना अचानक सोमवार दि. १५ जुलै २०२५ रोजी पुन्हा अतिवृष्टीमुळे आंबेनळी घाटामध्ये ५-६ ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या स्वाक्षरीनिशी पुन्हा नवीन अधिसूचना काढण्यात येऊन दि.१५ ऑगस्टपर्यंत अवजड वाहनांना घाटरस्त्यावरून वाहतुकीस बंदी कायम ठेऊन छोटया वाहनांसाठी अतिदक्षतेसह वाहतुकीची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे आंबेनळी घाटात दरडबंदीऐवजी आता घाटबंदीचाच उपाय झाल्याचे दिसून येत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# हिरो मोटोकॉर्पने लॉंच केली एचएफ डिलक्स प्रो



हिरो मोटोकॉर्पने त्यांच्या लोकप्रिय बाईक एच एफ डिलक्सचा एक नवीन प्रकार, एच एफ डिलक्स प्रो लॉंच केला आहे. त्याची किंमत ७३,५५० रुपये (एक्स-शोरूम, दिल्ली) ठेवण्यात आली आहे.

या बाईकमध्ये नवीन काय आहे? ही बाईक स्टायलिश डिझाइन आणि अनेक नवीन वैशिष्ट्यांसह येते.नवीन डिझाइन: बाईकला एक नवीन आणि आकर्षक लूक देण्यात आला आहे, ज्यामुळे ती अधिक स्टायलिश बनते.

एलईडी हेडलॅम्प: या सेगमेंटमध्ये पहिल्यांदाच, क्राउन शेपचा एलईडी हेडलॅम्प देण्यात आला आहे, जो चांगला प्रकाश देतो. डिजिटल कन्सोल: प्रगत डिजिटल स्पीडोमीटर रिअल-टाइम डेटा प्रदान करतो.

बाईकची इतर खास वैशिष्ट्ये

i3S तंत्रज्ञान: हे एक स्मार्ट वैशिष्ट्य आहे जे ट्रॅफिकमध्ये थांबल्यावर किंवा थांबल्यावर बाईक आपोआप बंद करते, त्यामुळे इंधनाची बचत होते. जेव्हा तुम्ही क्लच दाबता किंवा थ्रॉटल देता तेव्हा बाईक त्वरित पुन्हा सुरू होते.

९७.२ सीसी इंजिन: हे इंजिन ७.९ बीएचपी पॉवर आणि ८.०५ एनएम टॉर्क निर्माण करते, जे रोजच्या वापरासाठी पुरेसे आहे.


चांगला मायलेज: ही बाईक प्रति लिटर ६०-७० किलोमीटर मायलेज देते, ज्यामुळे ती किफायतशीर होते.

शहरातील दैनंदिन प्रवाशांसाठी एक चांगला पर्याय

कमी बजेटमध्ये स्टाईल, मायलेज आणि विश्वासार्ह बाईक हवी असलेल्यांसाठी एचएफ डिलक्स प्रो परिपूर्ण आहे. ही बाईक विशेषतः शहरातील दैनंदिन प्रवाशांसाठी एक चांगला पर्याय आहे. हिरोची ही नवीन बाईक बाजारात आधीच उपलब्ध असलेल्या एचएफ डिलक्स आणि एचएफ १०० सोबत विक्रीसाठी उपलब्ध असेल.

दरम्यान, या आधुनिक बाईकमुळे वाहनचालकांनी सोशल मिडीयाद्वारे आनंद व्यक्त केला आहे. तसेच या बाईकची नोंदणी सुरू झाली आहे.

# प्रख्यात बासरीवादक पन्नालाल घोष



## निमित्त

पन्नालाल घोष हे एक प्रख्यात बासरीवादक होते. त्यांचे पूर्ण नाव अमल ज्योती घोष असे होते. त्यांनी बासरी या वाद्यात अनेक सुधारणा केल्या तसेच बासरी वादन हे भारतीय गायकीच्या जवळ नेऊन ठेवले. पन्नालाल घोष यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया या लेखातून...

पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी बारिसाल (बांगलादेश) येथे झाला. त्यांचे वडील अक्षयकुमार घोष हे उत्तम सतारवादक होते. वयाच्या चौदाव्या वर्षीच पन्नालाल बासरीकडे आकृष्ट झाले. पुढे १९३४मध्ये त्यांनी मास्टर खुशी महम्मद या संगीतकाराचे शिष्यत्व पत्करले. 'सराईकेला नृत्यमंडळी'त ते काही काळ संगीत दिग्दर्शक होते. 'सराईकेला नृत्यमंडळी'बरोबर १९३८मध्ये पन्नालाल यांना युरोपचा प्रवास घडला. गिरिजा शंकर चक्रवर्ती यांच्याकडे १९३९मध्ये आणि पुढे १९४७च्या सुमारास उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे पन्नालाल यांनी संगीताचे अधिक शिक्षण घेतले.

पन्नालाल घोष हे चित्रपटक्षेत्रात १९४० ते १९४४ या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून होते व पुढेही तेथेच १९५६पर्यंत बासरीवादक होते. या काळात त्यांनी बासरीवादनाचे स्वतंत्र कार्यक्रमही केले. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रात १९५६पासून ते वाद्यवृंद निर्देशक होते. पन्नालाल घोष हे १९४० साली मुंबई येथे वास्तव्यास होते. त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये संगीत दिग्दर्शकाचे आणि बासरीवादनाचे काम केले. त्यांनी बासरीत अमुलाग्र परिवर्तन घडविले. बासरीची लांबी ४०-४२ इंचांपर्यंत वाढविली तसेच बासरीवर बोटे ठेवण्याचे वेगळे तंत्र विकसित केले. पंडितजींनी अनेक नवीन रागांची निर्मिती केली. त्यातील राग जयंत हा एक महत्त्वाचा राग आहे.

पन्नालाल घोष हे बासरीवादनाच्या क्षेत्रातील एक युगप्रवर्तक होत. वेणुवादनाला भारतात दीर्घकालीन इतिहास असला तरी बासरीवादनाला एक स्वतंत्र व स्वायत्त दर्जा मिळवून देण्यात पन्नालाल यांचा फार मोठा वाटा होता. ख्यालगायनातील आलापासारखे विलंबित संगीतविस्तार आणि सतार, सरोद इ. तंतुवाद्यातील 'झाला' सारखे द्रुत वादनप्रकार या दोहोंना बासरीवादनात अंतर्भूत करून पन्नालाल घोष यांनी या वाद्याची सांगीतिक विकसनक्षमता विस्तृत केलीख्यालगायनातील आलापासारखे विलंबित संगीतविस्तार आणि सतार, सरोद इ. तंतुवाद्यातील 'झाला'सारखे द्रुत वादनप्रकार या दोहोंना बासरीवादनात अंतर्भूत करून पन्नालाल यांनी या वाद्याची सांगीतिक विकसनक्षमता विस्तृत केली. यासाठी त्यांनी संशोधन करून मोठ्या व्यासाची, अधिक लांबीची व परिणामतः अधिक स्वरक्षेत्राची बासरी तयार केली. अर्ध, पाव इ. स्वरांतरे आणि मिडकामासारखे संगीतालंकार बासरीवादनातून यशस्वी करून दाखविले.

संगीत दिग्दर्शक आणि रचनाकार म्हणूनही पन्नालाल यांनी कीर्ती मिळविली. त्यांच्या इतजार, बसंत ह्या चित्रपटांच्या संगीतरचना व 'आशा', 'बागेश्री', 'ऋतुराज', 'कलिंगविजय', 'भैरवी', 'ज्योतिर्मय अमिताभ' इ. वाद्यवृंदरचना गाजल्या आहेत. त्यांच्या शिष्यगणांत हरिप्रसाद चौधरी, देवेंद्र मुर्डेश्वर, बेडा देसाई इ. प्रसिद्ध बासरीवादकांचा समावेश होतो. अशा या श्रेष्ठ बासरीवादकाचे २० एप्रिल १९६० रोजी निधन झाले.

**(साभार : मायमहानगर)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# सांध्याची सूज व वेदना संपवते हे घरगुती उपाय

अर्थरायटिस किंवा संधिवात हा एक असा आजार आहे, ज्यामुळे सांध्यांवर सूज चढते व प्रचंड वेदना सुरू होतात. याकडे दुर्लक्ष केल्यास हाडांचे गंभीर आजार होऊ शकतात. खाली दिलेले सोपे उपाय करून तुम्ही वेदना आणि सूजेपासून आराम मिळवू शकता.अर्थरायटिसहा एक सामान्य परंतु त्रासदायक आजार आहे, ज्यामुळे सांधेदुखी, सूज आणि अस्वस्थता होते. हा आजार केवळ वयोवृद्धांमध्येच नाही तर काही वेळा तरुणांमध्येही दिसून येतो. पण आर्थ्रायटिसच्या प्रकारांनुसार वेदनादेखील भिन्न प्रकारच्या असतात. संधिवातामध्ये सकाळच्या वेळी थंड - दमट वातावरणात जास्त वेदना होतात दीर्घ काळासाठी वेदना होतात यासाठी औषधोपचार आवश्यक असले तरी काही घरगुती उपायदेखील यावर प्रभावी ठरू शकतात.



आल्याचा चहा : आल्यामध्ये आढळणारे जिंजरोल हे घटक अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. आले सेवन केल्याने सांध्यातील सूज आणि वेदना कमी होतात. एक कप पाणी गरम करा. त्यात एक चमचा किसलेले आले घाला. ५-१० मिनिटे उकळा. चहा गाळून त्यात मध किंवा लिंबाचा रस घाला. हा चहा दिवसातून दोनदा प्या.

हळद : हळदीत असलेल्या कर्क्युमीन या घटकामुळे ते एक प्रभावी अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट ठरते. एक कप गरम दूध घ्या. त्यात एक चमचा हळद घाला. चवीसाठी थोडे मध घालू शकता. हे दूध रात्री झोपण्यापूर्वी प्या. हळदीचे दूध नियमित प्यायल्याने सांधेदुखी कमी होते आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

दालचिनी :दालचिनीत अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. एक कप गरम पाण्यात अर्धा चमचा दालचिनी पावडर घाला. त्यात एक चमचा मध घाला. हे पेय दररोज सकाळी प्या. दालचिनीचे नियमित सेवन केल्याने सांधेदुखी कमी होते आणि सांध्यातील सूज उतरते.

ॲप्पल सायडर व्हिनेगर : ॲप्पल सायडर व्हिनेगरमध्ये असलेले पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स सांध्यातील विषारी द्रव्ये बाहेर काढण्यास मदत करतात. एक ग्लास गरम पाण्यात दोन चमचे सफरचंद साइडर व्हिनेगर घाला. त्यात एक चमचा मध घाला. हे पेय दिवसातून दोनदा प्या.

गरम पाण्याच्या पिशवीने शेकवा : गरम पाण्याची पिशवी प्रभावित सांध्यावर १०-१५ मिनिटे ठेवा. दिवसातून दोनदा करा.

# अलिबाग तालुक्यातील सांबरकुंड धरणाचे काम लवकरच होणार सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील सांबरकुंड धरणाच्या काम लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. वन विभागाने धरणाच्या कामाला मंजूरी दिली आहे. त्यामुळे धरणाच्या कामाचा मार्ग अधिक सुकर होणार आहे.



२०२०मध्ये पर्यावरण विभागाची या प्रकल्पाला मंजूरी मिळाली होती. मात्र धरणाच्या पाणलोट क्षेत्रात २३८ हेक्टर वनजमीन जाणार असल्याने प्रकल्पासाठी वनविभागाची मंजूरी आवश्यक होती. ही मंजूरी प्राप्त झाल्याने आता धरणाच्या कामातील मोठा अडसर दूर झाला आहे.

अलिबाग तालुक्यातील अडीच हजार हेक्टर शेती सिंचनाखाली यावी आणि तालुक्यातील पाणी प्रश्न सुटावा यासाठी १९८३ साली या धरणाच्या कामाला मंजूरी मिळाली होती. मात्र भूसंपादन अडचणी, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रश्न, वन आणि पर्यावरण विषयक मंजूरी या कारणांसाठी धरणाचे काम रखडत गेले. नंतर जवळपास चार दशके लालफितीत अडकलेल्या या धरणाच्या फायलीवरची धुळ आता झटकली गेली आहे. हेटवणे मध्यम पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून या धरणाचे काम पूर्ण केले जाणार असून,

### प्रकल्पासाठी करण्यात येणारे एकूण भूसंपादन १०३.८१ हेक्टर

**धरणाची लांबी – ७३०.५९ मीटर, धरणाची उंची – ३८.७८ मीटर कालव्यांची कामे – २, अपेक्षित पाणीसाठा – ४९.८५ दशलक्ष घनमीटर, प्रकल्पामुळे सिंचनाखाली येणारी शेती – ४ हजार ३१४ हेक्टर, पाणी पुरवठा करण्यात येणारी गावे – २४**

प्रकल्पाची निविदा प्रक्रीयाही पूर्ण झाली आहे.

धरणाच्या कामासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्याने, धरणाचे काम लवकरच सुरु होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विस्थापित कुटूंबांचे रामराज येथील राजेवाडी येथे पुनर्वसन केले जाणार आहे.

**धरणाच्या कामात अनेक अडचणी होत्या, मात्र आता त्या दूर झाल्या आहेत. विस्थापित कुटूंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्नही मार्गी लागत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत धरणाचे काम लवकरच सुरु होईल..**

**–महेंद्र दळवी, आमदार**

यासाठी १६ हेक्टर भुखंड उपलब्ध करून देण्यात आला असून त्यावर सुमारे तीनशे घरे बांधून दिली जाणार आहेत. या प्रकल्पासाठी संपादीत होणाऱ्या जागेच्या भूसंपादनासाठीचा २०१३ साली निवाडा प्रसिध्द झाला होता. मात्र वाढीव मोबदला मिळावा अशी मागणी प्रकल्पबाधितांनी केली होती. त्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

## नागाव ग्रामस्थांच्या मनात भीतीच्या लाटा; बंधाऱ्याअभावी उधाणाचे पाणी लोकवस्तीत

**पाली : प्रतिनिधी**

कोकणाला ७२० किलोमीटर लांबीचा विस्तृत आणि अथांग असा सागर किनारा लाभलाय. या सागर किनारपट्टीची सुरक्षा ही येथील बंधाऱ्यांवर अवलंबुन असते. याच उद्देशाने तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या पुढाकाराने सबंध कोकण किनारपट्टीकडे विशेष लक्ष देत बंधारे निर्माण करण्यावर विशेष भर दिला होता, मात्र आजमितीस अनेक ठिकाणचे बंधारे नामशेष झाल्याची परिस्थिती दिसून येतेय.



अलिबाग तालुक्यातील नागाव समुद्र किनारपट्टी त्यापैकीच एक. याठिकाणी असलेला ६ किमी चा बंधारा आता पूर्णपणे उध्वस्त झालाय. बंधाऱ्याचे दगड गोटे निखळून पडलेत. सुरुची झाडें उन्मळून पडली आहेत. मातीची मोठी धूप झालीय. अशातच उधान आणि खवळलेल्या समुद्राला रोखण्याची क्षमता असलेले बंधारे नसल्याने हे पाणी सीमा ओलांडून लोकवस्तीकडे झेपावतेय. पावसाळ्यात तर गावकऱ्यांच्या मनातील भीती अधिक गडद झालीय, किनार पट्टीवरील नागरिक, रिसॉर्ट मालक, व्यवसायिक भयभीत झाले आहेत.

बंधाऱ्यामुळे जमिनीची धूप थांबते, सागराचे अतिवेगवान प्रवाहाचे पाणी बंधाऱ्यावर धडकून शांत होते. तुफान वादळी वाऱ्यात, अति वृष्टीत देखील पाण्याच्या वेगवान प्रवाहाला रोखण्याचे काम बंधारा करतो. मात्र किनारपट्टीवर बंधारा नसेल तर जमिनीची धूप होते. सागराचे खारे पाणी सीमा ओलांडून लोकवस्तीत शिरते. येथील पिण्याच्या पाणी साठ्यात खारे क्षार मिसळून पाणी खारट होते. सुरुचे घनदाट बन उध्वस्त होतात. शिवाय समुद्र किनाऱ्यावरील हिरवळ देखील नष्ट होते. पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतोय. निसर्ग सौन्दर्य देखील लुप्त होत आहे. असे असताना सरकार व लोकप्रतिनिधी या महत्वपूर्ण समस्येकडे डोळे झाक करत आहे. त्यामुळे येथील रहिवाशी आणि स्थानिकांनी संताप व्यक्त केला आहे.

नागाव ग्रामस्थ डॉ.सचिन राऊळ म्हणाले की नागाव च्या बंधाऱ्याची अवस्था भयावह व बिकट आहे. बॅरिस्टर ए आर अंतुले यांच्या काळात बंधारा बांधला होता. त्यानंतर या बंधाऱ्याकडे कुणीच लक्ष दिले आहे. मोठी भरती येते या भरतीने वनविभागाने इथं वन लागवड केली होती, मात्र तीही यामुळे वाहून गेली आहे. टप्प्याटप्प्याने समुद्र गावाकडे पुढे सरकत आहे,येथे पाण्याचे स्त्रोत विहिरीच्या रुपात मर्यादित आहेत. एम आय डी सीचे पाणी येत नाही. उमटे धरण आहे, पण पाणीपुरवठा मुबलक व सुरळीत नाही. आमचे जीवन पर्यटनावर आहे. जर पिण्याचे पाणी जर खारे झाले तर आमचे व्यवसाय ठप्प होऊन उदरनिर्वाहाचे मोठे संकट ओढवेल, अशी भीती डॉ. सचिन राऊळ यांनी व्यक्त केली.

## पाककला स्पर्धेत प्राची मसाल प्रथम

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे महिलांसाठी पाक कला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून मुरुड शहरातील विविध भागातून महिलांनी सहभाग घेऊन विविध चविष्ठ पदार्थ बनवले होते.

खासदार सुनीलजी तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महिला व बाल विकासमंत्री अदिती सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड मध्ये काल पाककला स्पर्धा झाल्या. या पाककला स्पर्धेमध्ये ११५ महिलांनी सहभाग घेतला होता. सर्व महिलांना तटकरे साहेबांकडून एक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राची मसाला यांना रोख ८००० रुपये , द्वितीय क्रमांक पूनम जैन रोख रक्कम ५००० रुपये ,तृतीय क्रमांक निखत चौगले रोख रक्कम ३००० रुपये, उत्तेजनार्थ प्रथम वर्षा भोय, उत्तेजनार्थ द्वितीय स्नेहा गद्रे याना प्रत्येकी २००० हजार रुपये बहाल करण्यात आला आहे.तसेच या स्पर्धेत सर्व सहभागी महिलांना भेट वस्तू सुद्धा देण्यात आलेल्या आहेत.

कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, महिला तालुका अध्यक्ष ॲड.मृणालताई खोत, रायगड जिल्हा सोशल मीडिया उपाध्यक्ष हसमुख जैन प्रमुख नेते अजित कासार, प्राध्यापक विश्वास चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार, तालुका चिटणीस विजय पैर, महिला मुरुड तालुका अल्पसंख्यांक अध्यक्ष मुसरत उलडे, मुरुड महिला शहर अध्यक्ष शितल घरत, वासंती उमरोटकर, नाना गुरव, माजी नगरसेवक प्रीता चौलकर, माजी नगरसेविका प्रमिला माळी, रिया मयेकर, जुई गुंजाळ उपस्थित होते.

## साळाव येथून महिला बेपत्ता

**रेवदंडा: प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील सालाव येथून महिला बैपत्ता झाल्याची तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे नोंदविण्यात आली आहे. साळाव येथील ३७ वर्षीय महिला गायत्री रिकेश जैन ही दि. १६ जुलै २०२५ रोजी सायकांळी चार वाजता घरातून दळण आणावयास जाते असे सांगून निघून गेली ती घरीपरत न आल्याने तिचे नातेवाईकांनी तिच्या आजूबाजूच्या परिसरात व नातेवाईक यांचेकडे शोध घेवून देखील ती सापडून आली नाही. सदर महिलेची मिसिंग तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे नोंद करण्यात आली आहे. सदर महिलेचा बांधा सडपातळ असून उंची १५५ से.मी., रंगवर्ण सावळा, नेसूस गुलाबीरंगाची साडी व पिवळेरंगाचा ब्लाउज आहे. सदरची महिला कोठे आढळून आल्यास अथवा तिच्या बाबतीत कोणतीही माहिती प्राप्त झाल्यास रेवदंडा पोलिस ठाण्याचा महिलापोलिस हवालदारशिला ठाकूर यांचेकडे संपर्क साधवा असे आवाहन केले आहे



## विश्रांतीनंतर रोह्यात पावसाची दमदार हजेरी

**रोहे महादेव सरसंबे**

रोहा तालुक्यात विश्रांतीनंतर मंगळवारी दुपारनंतर पावसाने दमदार सुरुवात केली आहे. रात्रभर पाऊस पडत होता. बुधवारी ही सकाळपासूनच पावसाने दमदार सुरुवात केली होती. संपूर्ण वातावरण पाऊसमय झाल्याचे दिसून आले आहे.



बुधवारी सकाळपासून पावसाने सुरुवात केली आहे. सकाळपासूनच पावसाचे वातावरण दिसून येत होते. चांगला पाऊस बुधवारी पडला आहे. विश्रांतीनंतर आलेल्या पावसाचा शेतकऱ्यांना फायदा होणार असून त्यामुळे शेतकरी सुखावला आहे.

डोंगर माथ्यावरून मोठ्या प्रमाणात नदी, नाल्यातून पाणी येत असल्याने कुंडलिका नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात पाणी आले होते.

रायगड जिल्ह्यातील २८ धरणांपैकी २३ धरणे १०० टक्के भरली आहेत. २८ धरणक्षेत्रात सरासरी ९३.३६ एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली धरणक्षेत्रात ३७ टक्के पाणीसाठा असुन हे धरण वगळता अन्य धरणे भरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात धरण क्षेत्रात मुबलक पाणीसाठा झाला असून हा पाणीसाठा गेल्या वर्षापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

## मंथन सामान्य ज्ञान परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**तळा : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा तळा मराठी येथे मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा नुकताच गुणगौरव सोहळा पार पडला.

गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला मुबीन वासकर, विवेकानंद पोटे, सरलादेवी पवार, प्रमोद मोरे उपस्थित होते.

यावेळी खालील विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. इयत्ता १ ली, आयुष संतराम बोडखे, इयत्ता २ री यशवर्धन धनंजय पवार, स्वरा शंकर वाघरे – रूही रवी नाक्ते इयत्ता ३ री कोमल तुषार वाडेकर , संस्कृत रविंद्र लोखंडे, इयत्ता ४थी, पार्थ प्रमोद मोरे ज्ञानदा गहिनीनाथ उस्तुरे , मानवी लालसिंग पवार, साईश रविंद्र लोखंडे, इयत्ता ५वी, श्रावणी प्रल्हाद दळवी, इयत्ता ७ वी, प्रांजल विश्वास गपट यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



## कळंब येथील शासकीय आश्रमशाळा पुन्हा सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कळंब येथील शासकीय आश्रम शाळा काही वर्षे बंद होती. आदिवासी बांधव ही आश्रम शाळा सुरु करावी. अशी सातत्याने मागणी करीत होते. आमदार आणि पेण आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने ही आदिवासी आश्रम शाळा पुन्हा सुरु करण्यात आल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची चांगली सोय होणार आहे.



कर्जत तालुका बहुल आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यात ठाकूर, कातकरी, महादेव कोळी समाजाच्या जमातीचे लोक मोठ्या प्रमाणात राहतात. तालुक्यात चार शासकीय आश्रम शाळा असून आदिवासी विद्यार्थी संख्या खुप असल्याने शाळा अपुऱ्या पडत आहेत. आदिवासी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये याची दखल घेत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणचे प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे तसेच तालुक्याचे लोक प्रतिनिधी आमदार महेंद्र थोरवे तसेच तालुक्यातील आदिवासी समाज संघटना यांच्या पुढाकाराने कळंब येथील काही वर्षापासून बंद पडलेली शासकीय आश्रम शाळा पुन्हा सुरु करण्यात आली.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या कार्यक्षेत्रातील कळंब आश्रमशाळा पटसंख्या अभावी बंद करण्यात आली होती. बंद केलेली आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना पालकांच्या पसंतीनुसार व भौतिक सोयी सुविधा असलेल्या जवळच्या आश्रम शाळांमध्ये प्रवेश देण्यात आला होता तसेच या आश्रम शाळेमध्ये शिकवत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अन्य ठिकाणी पाठवण्यात आले होते. सध्या स्थितीत रायगड जिल्ह्यात आदिवासी जमातीची कातकरी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्याने त्या ठिकाणी शासकीय आश्रम शाळा सुरू करण्याबाबत मागणी होत असल्याने या ठिकाणी सन २०२५ – २०२६ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय आश्रम शाळा सुरू करण्यात आली आहे.

कर्जत तालुका आदिवासी समाज संघटनेची वारंवार कळंब येथील बंद केलेली आश्रम शाळा चालू करण्याची मागणी केली होती.


### दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड

ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

परिशिष्ट IV

**ताबा सूचना**

[नियम-८(१)]

(स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार यांनी, दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि., चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (५४/२००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दि. २४.०६.२०२४ रोजी मागणी सूचना आणि त्यानंतर दिनांक १०.०८.२०२४ रोजी ॲक्टिव्ह टाईम्स आणि राम प्रहारमध्ये वृत्तपत्र प्रसिद्धी जारी करून कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार **मे. दिपक ट्रान्सपोर्ट, प्रोप्रायटर श्री. दिलिप बाळू खुटले, श्री. रमेश बाळकृष्ण ठाकूर आणि श्री. हेमंत नामदेव ठाकूर** यांच्याकडे सूचनेमध्ये उल्लेख केलेली दि. ३१.०५.२०२४ रोजीनुसारची रक्कम **रु. ४५,४७,५४९.१०/- (रुपये पंचेचाळीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे एकोणपन्नास व पैसे दहा मात्र)** व दि. ०१.०६.२०२४ पासून संपूर्ण परताव्यापर्यंतचे पुढील व्याज परतावा करण्याची मागणी केली होती.
कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार/ गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमन, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **दि. १९ जुलै, २०२५** रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.
विशेषतः वरील उल्लेखित कर्जदार/ गहाणवटदार/ जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., कापड बाजार शाखेच्या रक्कम **रु. ४५,४७,५४९.१०/- (रुपये पंचेचाळीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे एकोणपन्नास व पैसे दहा मात्र)** आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.
**तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री. दिलिप बाळू खुटले यांच्या नावे असलेला गाव नंदगाव, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. ५२, हिस्सा क्र. ५, प्लॉट क्र. ६ धारण केलेला अ-कृषिक भूखंड, क्षेत्रफळ ४०० चौ.मी.


सही/-
प्राधिकृत अधिकारी
दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.

ठिकाणः पनवेल
दिनांकः १९.०७.२०२५


## खोपोली सिटी बसस्थानकात समस्यांचे साम्राज्य

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका जुन्या प्रशासकीय इमारतीला लागून असलेल्या खोपोली नगरपालिका सिटी बस स्थानक व यातील गैरसोयी मोठी समस्या बनली आहे . या बाबत नगरपालिका प्रशासन व संबंधित परिवहन सेवा ठेकेदाराचे पूर्ण दुर्लक्ष असल्याचे स्पष्ट होत आहे .



वर्तमान स्थितीत या स्थानकात मोठ मोठे खड्डे पड्ल्याने मोठ्या प्रमाणात पाऊसाचे पाणी साचत आहे .त्यात सर्वत्र चिखल निर्माण झाल्याने शाळकरी विद्यार्थी व सर्वसामान्य प्रवाशांना बस मध्ये जाण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे .खड्डे टाळण्यासाठी होत असलेल्या कसरतीत येथे अनेक वेळा अपघात होत आहेत .यामुळे विद्यार्थी व प्रवाशांत नगरपालिका विरोधात संताप व्यक्त होत आहे . दुसरीकडे प्रशासन मात्र कराराचा अटी शर्ती नुसार या स्थानकाची देखभाल व डागडुजीची जबाबदारी परिवहन सेवा ठेकेदारांची असल्याचे सांगत जबाबदारी झटकत आहे .

नगरपालिका सिटी बस स्थानकातील वर्तमान स्थिती बाबत प्रचंड संतापजनक प्रतिक्रिया उमटत असून , शहराचा आरसा असलेल्या या स्थानकात पडलेले खड्डे , निवारा शेडची दुरावस्था, बिघडलेली सार्जनिक स्वच्छता येथील शौचालय , मुतारीची झालेली दुरास्था कडे बघण्यास संबंधित अधिकारी व जबाबदार ठेकेदाराला वेळ मिळत नसेल, तर शहरातील अन्य ठिकाणी नागरी समस्या कशा सुटतील असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**सिटी बसस्थानकातील खड्डे बुजविन्यासाठी येथे बारीक खडी व कच टाकण्यात येईल. याबाबत त्वरित कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाला आदेश दिले जातील.**

**–डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी, खोपोली नगरपालिका**


### पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२–२७४५२२३३ Email: panvelcorporationgmail.com

**निविदा सुचना**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १) | PMC/ WS/12/ 2025-26 | पनवेल शहरातील जलशुध्दीकरण केंद्र येथील ६.२५ लक्ष लिटर्स क्षमतेचा उंच जलकुंभ पाडणे. | रु. १९,१८,७५०/– |

वरील ई निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २४/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३४८/३५८/२०२५
दिनांक :– २३/०७/२०२५

सही /–
(गणेश शेटे)
अतिरिक्त आयुक्त –१
पनवेल महानगरपालिका

## निवडक

### प्रवासादरम्यान ऐवजाची चोरी

**पनवेल :** पनवेल रेल्वेस्थानकाबाहेर बाकड्यावर झोपलेल्या एका प्रवाशावर लुटारूने हल्ला करून सोनसाखळी हिसकावली. पहाटे चारच्या सुमारास ही घटना घडली. पनवेल शहर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या प्रवाशाचे नाव निखिल निकम (वय २२) असे असून तो नेरूळ येथे राहतो. पहाटे निखिल पनवेल रेल्वेस्थानकात आला होता. रेल्वे स्थानकाबाहेरील बाकड्यावर झोपला असताना लुटारूने त्याच्या पॅन्टच्या खिशातील मोबाईल काढण्याचा प्रयत्न केला. निखिलला जाग आल्याने लुटारूने त्याच्या हातातील जड वस्तूने निखिलच्या डोक्यात मारून जखमी केले. त्यानंतर त्याची सोनसाखळी हिसकावून पळ काढला.

### अनोळखी इसमाचा मृत्यू

**पनवेल :** एका अनोळखी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अनोळखी पुरुष (आझाद) अंदाजे वय ४७ वर्षे, उची-५फूट ६ इच, रंग सावळा चेहरा-उभट असे वर्णन असून मयत अनोळखी इसम हा जागृती रिहॅबलिटेशन सेंटर प्लॉट में ६ सेक्टर-११, तळोजा फाटा ता. पनवेल याठिकाणी भोवळ येवून पडले म्हणून त्याना उपचाराकामी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल या ठिकाणी व त्यानतर प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व तेथून सायन हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान कर्तव्यावरील डॉक्टरांनी मयत घोषित केले. सदर इसमाच्या नातेवाईकाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने तळोजा पोलीस ठाणे किंवा पो. उप. नि. अजयकुमार मोहिते यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोनसाखळी चोरटा गजाआड

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील कोटनाका येथील एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील चेन चोरणाऱ्या चोरट्याला उरण पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. याबाबतची सविस्तर माहिती उरण पोलिसांनी पत्रकारांना दिली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, कोटनाका येथे राहणारी कुसुम मारुती तांडेल (वय ६६) महिलेने १२ जुलै पहाटे ५.३० वाजता नेहमीप्रमाणे दरवाजा उघडला असता आरोपीने बळाचा वापर करून तिच्या गळ्यातील (३,३७,४८०किमतीची) ४.५ तोळे वजनाची सोन्याची चैन, हिसकावून पळून गेला. उरण पोलीस ठाण्यात महिलेने तक्रार नोंदविली असता उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानुसार उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकांनी तपास सुरू केले.

गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी संजय राठोड यांनी तपास केला व आरोपी मोहित गोपाल कोहली (वय २६, रा. नवघर) येथून १५ जुलै रोजी अटक केले आहे. २४ जुलैपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड किल आहे.




अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग विशाल नेहुल यांनी पत्रकार परिषदेत पत्रकारांना माहिती दिली. या वेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, पोलीस निरीक्षक राहुल काटवाणी, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी संजय राठोड उपस्थित होते. त्याप्रमाणे नवी मुंबई आयुक्त, सह पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त परीमंडळ २,सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग नवी मुंबई यांनी सदर सोन साखळी चोरास पकडून गंभीर गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्यासाठी सूचना व मार्गदर्शन केले. दरम्यान, अशा चोरट्यांपासून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# कॅबचालकाला मारहाण

## चौघांनी मोबाईल हिसकावून पैसेही लुटले

**पनवेल : वार्ताहर**

रॅपीडो ॲपवरून प्रवासी भाडे घेण्यासाठी गेलेल्या एका कॅबचालकाला चौघा लुटारूंनी बेदम मारहाण करून त्याचा मोबाईल हिसकावून खात्यातून फोन पेद्वारे जबरीने पैसे ट्रान्सफर केल्याची धक्कादायक घटना कळंबोली येथे घडली. कळंबोली पोलिसांनी या चौघा लुटारूंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.




या घटनेतील तक्रारदार कॅबचालकाचे नाव अब्दुल कादीर इस्माईल केळकर (वय ३१) असून हा मुंब्रा कौसा परिसरात राहण्यास आहे. सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास तो रॅपीडो ॲपवरून आलेले भाडे घेण्यासाठी कळंबोली सेक्टर-१७, रोडपाली येथील बालाजी इंटरनॅशनल स्कूलजवळ गेला होता. त्यावेळी मुंबई कुलाबा मार्केट येथे जाण्याच्या बहाण्याने दोघे लुटारू अब्दूलकडे विचारणा करून त्याच्या कारमध्ये बसले. त्यानंतर त्यांचे इतर दोन साथीदार देखील कारमध्ये बसले. त्यानंतर या चौघांनी कॅबचालक अब्दुल याला मारहाण करून त्याचा मोबाईल हिसकावून घेतला. त्यानंतर त्यांनी अब्दुला धमकावून त्याच्याकडून मोबाईलचा पासवर्ड आणि फोन पे ॲपचा पासवर्ड मागितला, मात्र अब्दुलने त्यांना पासवर्ड देण्यास नकार दिल्याने चौघा लुटारूंनी दमदाटी केली. त्यानंतर जबरदस्तीने फोनपेचा पासवर्ड घेऊन त्याद्वारे त्याच्या मोबाईलवरून पाच हजार रूपये आपल्या खात्यात वळते करून घेतले. त्यानंतर लुटारूंनी पलायन केले. या घटनेनंतर कॅब चालकाने कळंबोली पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चौकडी विरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

# मोबाईल हॅक करून बँक खात्यातून दीड लाख काढले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये राहणाऱ्या एका ६५ वर्षीय महिलेचा मोबाईल हॅंक कुरून त्यांच्या बॅंक खात्यातून दोन दिवसांत एकूण १ लाख ४७ हजारांची रक्कम परस्पर काढून घेतल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

पनवेल यैथे राहणाऱ्या सुजाता दांडेकर या पनवेलमधील ५२ बंगलो परिसरात राहतात. त्यांचे द आण्णासाहेब सावंत को-ऑपरेटिव्ह अर्बन बॅंक, महाड लि. या बॅंकेत खाते आहे. त्या घरी असताना, अज्ञात सायबर चोरट्याने त्यांचा मोबाईल फोन हॅंक केला. त्यानंतर त्याने सुजाता दांडेकर यांच्या मोबाईलमार्फत त्यांच्या खात्यातून ९ जुलै रोजी ९५ हजार



आणि १० जुलै रोजी ५२ हजार, अशी एकूण एक लाख ४७ हजारांची रक्कम परस्पर काढून घेतली. याबाबतचा मेसेज त्यांच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांना हा प्रकार लक्षात आला. प्राथमिक माहितीनुसार, अज्ञात सायबर चोरट्याने सुजाता दांडेकर यांच्या मोबाईल डिव्हाईसमध्ये प्रवेश करून डिजिटल बॅंकिंगद्वारे त्यांच्या खात्यातून ही रक्कम काढल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

**पोलिसांकडून आवाहन**

मोबाईलमध्ये अनोळखी ॲप इन्स्टॉल करू नका, परवानग्या डिव्हाईस शेअरिंग लिंक्स शेअर करू नका. स्क्रीन-शेअरिंग ॲपद्वारे तपासा. कोणाशीही ओटीपी, एमपिन, पासवर्ड, यूपीआय पिन, कोणी मदत देत असल्यास सावध राहा. बॅंक स्टेटमेंट नियमित तपासा; सायबर हेल्पलाईन १९३० वर तातडीने संपर्क साधल्यास निधी फ्रीज होण्याची संधी वाढते. संशयास्पद व्यवहार त्वरित बॅंकेला व पोलिसांना कळवा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये जादूई कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर येथे विद्यार्थ्यांसाठी एक अद्भुत जादूई कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम HATSUN ॲग्रो कंपनीच्या सौजन्याने घेण्यात आला होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करणारा जादूचा खेळ दाखवण्यात आला, ज्यामुळे प्रत्येकाच्या मनात बालसुलभ आनंद आणि कुतूहल निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या विशेष आकर्षणामध्ये HATSUN कंपनीतर्फे विद्यार्थ्यांना आकर्षक टिफिन बॉक्स आणि नोटबुक



लेबल्सदेखील भेट देण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी HATSUN ॲग्रो कंपनीचे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उपक्रमासाठी मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी सर्व मान्यवरांचे आणि जादूगाराचेसुद्धा आभार मानले, ज्यांनी विद्यार्थ्यांना एक अविस्मरणीय अनुभव दिला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनात दीर्घकाळ टिकणारी आठवण ठरली.

# खारघरमध्ये विविध ठिकाणी रक्तदान शिबिर; दात्यांचा प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (दि.२२) पनवेल मतदारसंघामध्ये विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांमध्ये रक्तदान शिबिरांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवत मोठ्या संख्येने रक्तदान केले. या शिबिरांमध्ये रक्तदान करणाऱ्या सर्व दात्यांना ब्लड डोनेट कार्ड आणि सन्मानपत्र देऊन



सन्मानित करण्यात आले.

पनवेल उत्तर मंडळाचे रक्तदान शिबिर पेठगाव येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात झाले. यावेळी भाजप नेते प्रल्हाद केनी, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, निर्दोष केणी, नितेश पाटील, महेश पाटील, प्रभाकर जोशी, अंकुश पाटील, विनेश कदम, अशोक साळुंखे, डॉक्टर संतोष आगलावे, दीपक उलवेकर, श्रुती कावळे, विनोद घरत, सुरेश पोरजी, आशिष कडू, कृष्णा पाटील, सुनील म्हात्रे, मन्सूर पटेल, शुभ पाटील, खारघर भाजप कार्यालयात झालेल्या शिबिरावेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, नीलेश बाविस्कर, अभिमन्यू पाटील, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, उमेश चौधरी, वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, बिना गोगरी, दीपक शिंदे, नितेश पाटील, संध्या शारबीद्रे आणि महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार तर पनवेल पूर्व मंडळाचे आकुर्ली येथील सेंट अँड्र्यू स्कुलमध्ये झालेल्या शिबिरावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पूर्व मंडळाचे अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, सुनील पाटील, महेश पाटील, नरेश पाटील, राजेश पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, अरुण पाटील, सागर पोपटा, राजा भालेकर, सतीश मालुसरे, राजेश भोईर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या रक्तदान शिबिरांमुळे समाजात रक्तदानाबद्दल जागरूकता वाढण्यास मदत झाली, तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस एका सकारात्मक आणि समाजोपयोगी पद्धतीने साजरा करण्यात आला.

# रक्तदान शिबिरात भाजप नेते सय्यद अकबर यांचेही योगदान

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या मुंबई मुख्यालयात बॉम्बे हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले.

सय्यद अकबर म्हणाले की, आज हजारो कार्यकर्त्यांचे जमा होणारे हजारो बॅग रक्त हे भविष्यात गरजवंतांसाठी वापरले जाणार आहे. सय्यद अकबर यांनी रक्तदान केल्यानंतर आयोजकांनी त्यांचा सन्मान केला. या वेळी मुंबई मुख्यालय प्रभारी तथा उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, आयुष्मान भारत प्रदेश अध्यक्ष सतीश तळेकर, प्रदेश प्रवक्ता अवधूत वाघ, भारतीय जनता पार्टीचे जैन सेलचे मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. विनोद कोठारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर कार्यकर्ते दिनेश शेलार, भाजपा मुंबई प्रदेश कार्यालयाचे कार्यालयीन सचिव मुकुंद कुलकर्णी,ज्येष्ठ भाजपा कार्यकर्ते श्रीनंद पटवर्धन यांच्यासह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.




# ४० यात्रेकरूंची अमरनाथ यात्रा सफल

**पनवेल : वार्ताहर**

ओम नमःशिवाय टूर्स पनवेल च्या माध्यमातून पंचक्रोशीतील ४० यात्रेकरूंची अमरनाथ यात्रा सफल होऊन ते पुन्हा सुखरूप परतले आहेत.

भगवान श्री शिवशंकर भोलेनाथ यांनी पार्वती मातेला ज्या गुफे अमरकथा सांगितली. परंतु ती अमर कथा. २ कबुतरांच्या जोडीने ऐकली. आणि ते दोघे अमर झाले. आज हजारो वर्षा पासून त्या गूफे मध्ये भगवान शिवांची नैसर्गिक बर्फाची शिवलिंग तयार होते त्याचे दर्शन घेण्या साठी लाखो भाविक दरवर्षी देशात व परदेशातून तेथे जात असतात. पनवेल येथील ओम नमः टूर्स चे यंदाचे २५ वे वर्ष असून आयोजक खंडेश धनावडे आणि आश्विन सातारकर यांच्या सोबत पनवेल, नवी मुंबई, भाताण, रसायनी तसेच मुंबई अश्या विविध ठिकाणी हून ४० यात्रे करूनचा ग्रुप करून १० दिवसाच्या यात्रेचे नियोजन करण्यात आले होते. यात अमरनाथ यात्रेसह वैष्णो देवी व काश्मीर आदींचा समावेश होता.

ही यात्रा करून भक्तगण सुखरूपपणे परतले. या यात्रेसाठी दरवर्षी फेब्रूवारी महाशिवरात्री झाल्यावर आम्ही बुकिंग सुरू करतो, अशी माहिती आयोजक खंडेश धनावडे आणि आश्विन सातारकर यांनी दिली.





# फुंडे विद्यालयात मोफत गणवेश वाटप

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथीलतुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या पाचवी ते दहावी मधील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सारिका पाटील - बोकडविरा, चंद्रविलास घरत भेंडखळ, निलेश ठाकूर शिवाजी नगर यांच्या मार्फत गणवेश देण्यात आले.

प्राचार्य बी.बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एम.बाबर, एस.एस. पाटील, सारिका पाटील, चंद्रविलास घरत, निलेश ठाकूर, सतीश घरत, प्रांजल भोईर, विकास शर्मा, निलेश झावरे, नितिन साखरे, व सेवक वृंद यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गणवेशाचे



वाटप करण्यात आले.

या वेळी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विविध शालेय समिती पुनर्गठीत करण्यात आल्या. विविध समित्यांची माहिती विभाग प्रमुखांनी दिली. शाळा व्यवस्थापन व्ही.व्ही.गावंड, माता पालक संघ एम.एम. खारपाटील, पालक शिक्षक संघ पी.ए. पाटील व शालेय पोषण आहार एस.डी. नाईक, नवभारत साक्षरता एच.एन.पाटील, गुरुकुल ए.आर म्हात्रे, तंबाखू नियंत्रण समिती नितीन साखरे, निलेश झावरे वैद्यकीय अधिकारी सर्व समिती सभेसाठी पालकांचा उत्स्पुर्त प्रतिसाद लाभला.

# श्रीवर्धन आगारात उभ्या दुचाकींमुळे प्रवासी त्रस्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



एकीकडे श्रीवर्धन एसटी बसस्थानकाला जिल्ह्यातील उत्पन्नदृष्ट्या महत्वाचे स्थानक मानले जात असताना दुसरीकडे प्रवाशांना येथील मूलभूत सुविधांसाठी रोजच्या रोज झगडावे लागत आहे. यामध्ये सध्या नव्या अडथळ्याची भर पडली असून, स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारालगत मधोमध उभ्या करण्यात येणाऱ्या मोटारसायकल्समुळे प्रवाशांचा प्रवास अक्षरशः धोकादायक बनू लागला आहे.

प्रवेशद्वारालगत व बस स्थानकाच्या समोरच पार्किंग केलेली दुचाकी वाहने हे प्रवाशांच्या सुरक्षिततेला मोठा धोका बनू लागले आहेत. विशेषतः वयोवृद्ध नागरिक, महिला, अपंग, आजारी रुग्ण व शालेय विद्यार्थ्यांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दुचाकींच्या हँडलमध्ये साडी, दुपट्टा किंवा दागिने अडकण्याची शक्यता सतत निर्माण होत असून अशा अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

या परिसरात शिस्तबद्ध पार्किंग न झाल्यामुळे स्थानकाच्या सौंदर्य व सुरक्षिततेला धक्का बसत आहे. लाखो रुपयांच्या निधीतून बसस्थानकांचे सुशोभीकरण केले जात असताना, मुख्य गेटमधील दुचाकींचा अडथळा हा त्या प्रयत्नांवर पाणी फेरणारा ठरत आहे. त्यामुळेच स्थानक परिसरात वाहन पार्किंगसाठी स्वतंत्र नियोजन करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

प्रवाशांकडून अनेकवेळा तक्रारी करूनही स्थानिक एस.टी. प्रशासनाचे याकडे कानाडोळा सुरूच आहे. तक्रार केल्यास कर्मचाऱ्यांकडून अरेरावीची वागणूक दिली जाते, असा आरोपही प्रवाशांनी केला आहे.

स्थानक परिसर हे नागरिक व प्रवाशांच्या सुरक्षिततेचा केंद्रबिंदू असतो, त्यामुळे याठिकाणी वाहतूक व्यवस्था शिस्तबद्ध ठेवणे ही महामंडळाची जबाबदारी आहे. उत्पन्न वाढवणे हे प्रशासनाचे उद्दिष्ट असले तरी प्रवाशांची गैरसोय टाळणे हे त्याच इतकेच महत्त्वाचे आहे. स्थानिक प्रशासनाने तत्काळ कारवाई करून प्रवेशद्वाराजवळील बेकायदेशीर पार्किंग हटवावे, स्पष्ट पार्किंग व्यवस्था निर्माण करावी, तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवासी वर्गाकडून होत आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात लवकरच 'अमृत' दालन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन अंगीकृत 'महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रबोधिनी अर्थात, 'अमृत' ही खुल्या प्रवर्गातील समाजघटकांच्या सर्वांगीण उत्कर्षांसाठी कार्यरत असलेल्या संस्थेचे रायगड जिल्हा मध्यवर्ती कार्यालय अलिबाग येथील रायगड जिल्हाधिकारी कार्यालयीन इमारतीत लवकरच सुरू होणार असल्याची माहिती 'अमृत'चे रायगड जिल्हा व्यवस्थापक शैलेश मराठे यांनी नुकतीच दिली आहे.

या विषयी ते म्हणाले, अमृत संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी श्रीराम बेंडे साहेब रायगड जिल्ह्याच्या दौऱ्या दरम्यान अलिबागला आले असता त्यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेतली. तसेच निवासी उप जिल्हाधिकारी संदेश शिर्के आणि तहसिलदार महसूल (चिटणीस) चंद्रसेन पवार यांचीही त्यांनी भेट घेतली. या भेटीमधे त्यांनी अमृत-चे रायगड जिल्हा मध्यवर्ती कार्यालय अलिबागमधे सुरु करण्याच्या व अमृत च्या कार्यासंदर्भात विस्तृत चर्चा केली.

तसेच महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र प्रकल्प अधिकारी आनंद विद्यागर, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांचीही भेट घेऊन अमृत संस्थेच्या विविध योजनांच्या संदर्भात विस्तृत चर्चा केली. त्याचबरोबर माहिती अधिकारी मनीषा पिंगळे यांनाही भेटून अमृत संस्थेच्या वेळोवेळी सुरु होणाऱ्या योजनांचा प्रचार-प्रसार-प्रसिद्धी या विषयी सहकार्य देण्या संदर्भात विनंती केली.

अमृत- संस्थेच्या योजनेत, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व्यक्तींना विविध प्रकारची मदत दिली जाते. त्याचप्रमाणे विविध व्यवसायांचं शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन दिले जाते. विविध शासकीय योजनांची माहिती आणि त्यांचा लाभ मिळवण्यासाठीची आवश्यक ती मदत केली जाते. या वर्गातील होतकरू व्यक्तींना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण तसंच आर्थिक साहाय्य आणि कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. पात्र उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठीही कार्यक्रम राबवले जातात.

या विविध योजनांमुळे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मोलाची मदत होणार असून, दुर्लक्षित घटकातील लोकांचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी योजनेच्या माध्यमातून विविध क्षेत्रांमध्ये मदत उपलब्ध करून दिली जाते. या योजनेत, लाभार्थ्यांना त्यांच्या गरजांनुसार मदत दिली जाते.

अमृत संस्थेच्या योजनेच्या अंतर्गत संगणक, टंकलेखन आणि लघुलेखन प्रशिक्षण योजना, विविध स्पर्धा परीक्षांसाठी पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम, उच्च कार्यक्षमता संगणक प्रशिक्षण (CADAC), स्वयं शिक्षण प्रोत्साहन योजना राबवण्यात येतातच. शिवाय एम.सी.ई.डी. यांच्या बरोबर केलेल्या कराराप्रमाणे सोलर पॅनल देखभाल दुरुस्ती, अमृत बेकरी, आयात निर्यात प्रशिक्षण, तसेच MCED संलग्नित स्वयं-रोजगार प्रशिक्षण व PMEGP/CMEGP PROJECT मार्गदर्शन असे अनेकविध उपक्रम राबविण्यात येतात.

अमृतमधील विविध उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी खुल्या प्रवर्गातील समाजघटकांनी अलिबाग येथील मध्यवर्ती कार्यालय अथवा शैलेश मराठे यांच्याशी ९११२२२८७५९ या संपर्क क्रमांकावर संपर्क करा अथवा अधिक माहितीसाठी या वेबसाइटला (www.mahaamrut.org.in) भेट द्यावी.

# 'अंनिस'च्या रोहा शाखा कार्यकारिणीची निवड

**रोहे : प्रतिनिधी**



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती रायगड जिल्ह्यातील सर्व शाखेतील कार्यकारणी निवड मोहीम चालू आहे. रोहा शाखेची कार्यकारणी निवड करण्यात आली.

रोहा शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. फरीद अब्दुल रहेमान चिमावकर यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष दत्तात्रेय तुकाराम शेडगे, कार्याध्यक्ष नंदकुमार राक्षे, प्रधान सचिव दिनेश शिर्के, अनिकेत पाडसे युवा सहभाग, प्रमोद खांडेकर बुवाबाजी संघर्ष विभाग, शुभांगी सावंत महिला सहभाग विभाग, दीपाली पोरे वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प विभाग, मुमताज मुलानी संस्कृतीक विभाग, मारुती फाटक वार्तापत्र विभाग, अब्दुल आश्पाक महेमद अनवारे विवेक वाहिणी विभाग, भागेश घोसाळकर विविध उपक्रम विभाग अशा पद्धतीत कार्यकारणी निवडण्यात आली. कार्यकारणी निवडण्यांसासाठी निरीक्षक म्हणून रायगड जिल्हा अध्यक्ष विवेक सुभेकर, जिल्हा कार्याध्यक्ष मोहन भोईर, जिल्हा प्रधान सचिव संदेश गायकवाड उपस्थित होते.

नवीन कार्यकारणीला मार्गदर्शन करताना मअंनिसची पंचसूत्री, नव्या कार्यकत्यांशी जोडून कस घ्यावा, अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

# मोरे महिला महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंती

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील एम. बी. मोरे महिला महाविद्यालय, धाटाव येथे सांस्कृतिक कार्य समितीने बुधवारी (दि.२३) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी केली.

सांस्कृतिक कार्य समितीच्या समन्वयक प्रा. प्रतिमा भोईर यांनी दीपप्रज्वलन व टिळकांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण केले तसेच टिळकांच्या समाजसुधारणेतील योगदानाबद्दल मार्गदर्शन केले.

या वेळी सांस्कृतिक कार्य समितीच्या सदस्य प्रा. ऋतुजा कांबळे, प्रथम वर्ष वर्गातील ५४ विद्यार्थिनी, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# करंबेळी ठाकूरवाडी येथे शालेय साहित्य वाटप

**खालापूर : रामप्रहर वृत्त**



भारतीय जनता पक्ष खालापूर तालुका यांच्या वतीने आज महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले.

यामध्ये खालापूर मंडळाकडून किरखिंडी येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले तर सामाजिक कार्यकर्ते भरत महाडिक यांनी सामजिक बांधिलकी जपत करंबेळी ठाकूर वाडी येथील प्राथमिक शाळेत शालेय साहित्य वाटप केले. पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना भरत महाडिक यांच्या माध्यमातून रेनकोट, वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून भरत महाडिक यांच्या माध्यमातून करंबेळी विभागात असे स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत असल्याने त्यांच्या ह्या उपक्रमाबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. या वेळी रवींद्र मोरे नितेश पाटील, आर के बाबले, प्रतिभा पाटील यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# महाड भाजपतर्फे विविध उपक्रम

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**महाड : प्रतिनिधी**



महाड भाजपच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, रुग्णांना फळ वाटप व आदीवासी विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करून करण्यात आला.

२२ जुलै या देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी कार्यकर्त्यांना कोणत्याही प्रकारचे बॅनर अथवा जाहिराती करू नये अशा सूचना केल्या होत्या त्या ऐवजी सामाजिक उपक्रम अथवा मुख्यमंत्री सहायता निधीसाठी अर्थसहाय्य मदत करावी, असे आव्हान केले होते. या आव्हानानुसारच महाड तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या वतीने जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर मंडळ अध्यक्ष निलेश तळवटकर व निलेश देवगीरकर यांच्या नेतृत्वाखाली आज सकाळी शासकीय रुग्णालयामधील रुग्णांना फळ वाटप व खाऊ वाटप करण्यात आले. जनकल्याण रक्तपेढी येथे रक्तदान शिबिर आयोजित करून रक्तदानाच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच कुंभार्डे आदिवासी वाडी येथील शाळेमध्ये मंडळ अध्यक्ष निलेश तळवटकर यांच्या सहकार्यातून तेथील विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेसाठी स्मार्ट टीव्ही देऊन, खाऊ वाटप करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांकडून देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, मंडळ अध्यक्ष निलेश तळवटकर जिल्हा कार्यकारणी सदस्य नीलिमा भोसले, संदीप ठोंबरे, महेश शिंदे, विकास दरेकर, अदिती ताडफळे, स्नेहल महामुणकर, जिगेसा बुटाला, यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी मार्गदर्शन करताना बिपीन महामुणकर यांनी मुख्यमंत्र्याच्या वाढदिवसानिमित्त आज आम्हाला या आदिवासी शाळेवरती मदत करता आली याचा आम्हाला आनंद होत आहे.

# भाजप खोपोलीतर्फे रक्तदान शिबिर उत्साहात

**खालापूर : प्रतिनिधी**

भाजप खोपोली शहर मंडलाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवसानिमित्त पक्षाचे कोणतेही नेते आणि कार्यकर्ते होर्डिंग, बॅनर न लावण्याचे आणि वृत्तपत्रातून/ टीव्ही माध्यमातून जाहिराती प्रसिद्ध न करण्याचे, असे आवाहन भाजपतर्फे करण्यात आले होते.

वाढदिवसानिमित्त प्रत्येक मंडलात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात यावे, ज्या कुणाला योगदान द्यायचे आहे, त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीत योगदान द्यावे, असे आवाहन सुद्धा पक्षा तर्फे करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने भारतीय जनता पक्ष खोपोली शहर मंडलाच्या वतीने रक्तदान शिबिर सकाळी १० ते १ या वेळेत महाराज मंगल कार्यालय येथे आयोजित केले होता. या शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पक्ष संघटनेने दिलेले लक्ष पूर्ण करण्यात आले.

रक्तदान शिबिराची सुरुवात भारत माता, श्यामाप्रसाद मुखर्जी व पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

पक्ष संघटनेने रक्तदान शिबिराचे आयोजन का करण्यास सांगितले याची माहिती व महत्त्व भाजप खोपोली शहर मंडल अध्यक्ष राहुल जाधव यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्यात गतिमान पद्धतीने चालू असलेल्या कामांची माहिती, त्यांनी घेतलेले महत्वपूर्ण निर्णय, राजकीय अनुभव व कार्यकुशलतेची माहिती भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील यांनी दिली.


रक्तदान शिबिराचे संयोजक म्हणून काम विकास नाईक यांनी पाहिले. या कार्यक्रमासाठी यशवंत साबळे, अजय इंगुळकर, निकेत पाटील, अश्विनी अत्रे, विक्रम साबळे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, इंदरमल खंडेलवाल, अविनाश तावडे, माजी शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, माजी नगरसेविका अनिता शाह, अपर्णा मोरे, हेमंत नांदे, रामचंद्र पवार, कृष्णा पाटील, सुनील नांदे, संजय म्हात्रे, अनिल कर्णुक, राजेंद्र शेट्ये, महेश खेडेकर, किर्ती ओसवाल, संजय करंजकर, सुभाष सावंत, जितू शहा, पियूष महर्षी, विजय कांबळे, अनिल अनिवार, अजिंक्य तावडे, अपर्णा साठे, रसिका शेट्ये, सुप्रिया नांदे, सुजाता मोहिते, सुमिता महर्षी, स्नेहल सावंत, भारती शाह, सीमा मोगरे, विभावरी पाठक आदी उपस्थित होते.



# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष सर्वसामान्यांचा आधार

मा. मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरिता रुग्णांना संबधीत रुग्णालय मार्फत अर्थिक सहाय्य देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात सदर अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असल्याने नागरीकांना या सेवा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे २०२५ रोजी औपचारिक उद्घाटन करून सुरू करण्यात आलेला आहे.

यामुळे राज्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी प्रत्येक जिल्हयातच जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती सहज उपलब्ध, संलग्न रुग्णालयाची यादी, अर्ज आणि पाठपुराव्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नाही तसेच अर्ज स्विकृती व सध्यस्थिती इत्यादी मदत पुरवली जाणार आहे.



जिल्ह्यात या योजनेचा अनेक गरजू लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून त्यातील एका लाभार्थ्यांनी दिलेली प्रतिक्रिया....

माझे वडील रविंद्र दुदाजी दामणे, रा. तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड, माझ्या वडिलांची प्रकृती दि. ३० मे २०२५ रोजी अचानक बिघडली. त्यांना बोलण्यात व हालचाली करण्यात अडचण निर्माण झाली. तातडीने त्यांना डॉ. आर. एन. पाटील हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना Acute Left Thalamic Bleed असल्याचे निदान दिले. या गंभीर परिस्थितीत आमची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असल्यामुळे आम्ही चिंतेत होतो. तेव्हा डॉक्टरांनी आम्हाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेबद्दल माहिती दिली. त्यानुसार आम्ही सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर केला. सुदैवाने आम्हाला या योजनेअंतर्गत ५० हजार रुपये आर्थिक मदत प्राप्त झाली.

या मदतीमुळे आम्हाला उपचार सुरू ठेवणे शक्य झाले आणि माझ्या वडिलांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. त्यामुळे मी व माझा संपूर्ण परिवार माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेबांचे मनःपूर्वक आभार मानतो. आपण गरजू रुग्णांसाठी सुरु केलेली ही योजना आमच्यासारख्या अनेक कुटुंबासाठी खूपच मोलाची आहे.

**-वृणाली रवींद्र पामने, कर्जत (भाग-३)**

# विजय भोसले यांची निवड

**रेवदंडा :** नाभिक तरूण संघाच्या रायगड जिल्हा पंचक्रोशी अध्यक्षपदी चौलचे रहिवाशी विजय नामदेव भोसले यांनी नुकतीच निवड झाली असून त्यांचे सर्व थरातून अभिनंदन करण्यात येत आहे. कोलाड येथील कै. पाडुरंग रामजी सकपाल सभागृहात रायगड जिल्हा नाभिक तरूण संघाची जिल्हा कार्यकारणी सभा सोमवारी घेण्यात आली.

या सभेत नाभिक समाजाचे चौल-नागाव-आक्षी-आंबेपुर विभागाचे विजय नामदेव भोसले यांची पुढील पाच वर्षासाठी रायगड जिल्हा पंचक्रोशी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. रायगड जिल्हा नाभिक तरूण संघात मध्ये त्यांनी मागील पाच वर्षात जिल्हा संघटक पदभार क्रियाशीलपणे सांभाळले आहे. जिल्हा पंचक्रोशीत अध्यक्षपदाची नियुक्तीने जबाबदारी वाढली आहे.

# पालीसह सुधागडात विक्रमी रक्तदान

**पाली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पाली सुधागडात विक्रमी रक्तदान शिबिर अत्यंत उत्साही व आनंददायी वातावरणात पार पडले. भक्त निवास १ येथे आयोजित रक्तदान शिबिराला सर्व स्थरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रक्तदानातून राष्ट्रभक्ती या सामाजिक बांधिलकी व सेवाभावी संकल्पनेतून अनेक रक्तदात्यांनी समाजाप्रती आपली जबाबदारी सिद्ध करीत रक्तदान केले.



या वेळी प्रकाश देसाई म्हणाले की, राज्याला एक सुसंस्कृत, विद्वान व विकासाचे अफाट व्हिजन असलेला दूरदृष्टीचा नेता देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने लाभला आहे. त्यांच्या वाढदिवशी राज्यभरात रक्तदान शिबिर हा मानवतावादी उपक्रम राबविला जात आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. विज्ञान तंत्रज्ञानाने सर्वच क्षेत्रात अगणित प्रगती केली असली तरी मात्र मानवी रक्ताला आजही पर्याय शोधता आला नाही. आपले एक थेंब रक्त इतर कुणाचे प्राण वाचवू शकते, ही रक्तदानाची अमूल्य किमया आहे. सर्वांनी रक्तदान शिबिरात सहभाग घेऊन हे शिबीर यशस्वी केले असल्याचे समाधान या वेळी देसाई यांनी व्यक्त केले.

या वेळी भाजप नेते प्रकाश भाऊ देसाई, गीता ताई पालरेचा, प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश मपारा, जिल्हा उपाध्यक्ष आलाप मेहता, श्रीकांत ठोंबरे, चंद्रकांत घोसाळकर, अ‍ॅड. सुभाष पाटील, अरिफ मणियार, पराग मेहता,प्रणाली शेठ, रोहण दगडे, सुजित बारस्कर, विशाल गुरव, सुशील शिंदे हिमांशू शहा, हरिश्चंद्र पाटील, संदेश लोंढे, सचिन भोईर, ऋषिकेश झा आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला टीम इंडियाचा इंग्लंडला धोबीपछाड

## टी-२०नंतर वनडे मालिकेवरही कब्जा

**लंडन : वृत्तसंस्था**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने टी-२० मालिकेनंतर इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांची एकदिवसीय मालिकाही ३-१ अशी जिंकली आहे. चेस्टर ली स्ट्रीट येथील रिव्हरसाईड मैदानात खेळवण्यात आलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात भारताने यजमान इंग्लंड संघावर १३ धावांनी मात करत मालिकेवर कब्जा केला.




इंग्लंडने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या शतकासह जेमिमा रॉड्रिग्जने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर भारतीय महिला संघाने निर्धारित ५० षटकात ३१८ धावा करत इंग्लंडसमोर ३१९ धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना क्रांती गौड हिने घेतलेल्या सहा विकेट्सच्या जोरावर भारतीय संघाने इंग्लंडच्या संघाला ४९.५ षटकात ३०५ धावांवर रोखत हा सामना जिंकला.

भारतीय संघाची उपकर्णधार आणि सलामीची बॅटर स्मृती मानधना हिने संघाला चांगली सुरुवात करून दिली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरलेल्या हरलीन देओलनेही आपल्या फलंदाजीची धमक दाखवली. दोघांनी प्रत्येकी ४५-४५ धावांचे योगदान दिले. त्यानंतर निर्णायक सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौर १०२ (८४) आणि जेमिमा रॉड्रिग्ज ५० (४५) जोडीने चौथ्या विकेटसाठी ७७ चेंडूत ११० धावांची खेळी करत इंग्लंडच्या संघाला बॅकफूटवर ढकलले. रिचा घोषने १८ चेंडूत नाबाद ३८ धावांची खेळी करत संघाच्या धावफलकावर पाच विकेट्सच्या मोबदल्यात ३१८ धावा लावल्या.

धावांचा पाठलाग करताना क्रांती गौड हिने इंग्लंडच्या दोन्ही सलामीच्या बॅटर्सना स्वस्तात पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. इमा लंब ६८ (८१), इंग्लंडची कर्णधार नॅटसायव्हर ब्रंट ९८ (१०५) सोफिया डंकली ३४ (३६) आणि लिस डेव्हिडसन रिचर्ड्स ४४ (३२) यांनी जोर लावला, पण शेवटी इंग्लंडचा डाव ३०५ धावांवरच आटोपला. भारताकडून क्रांती गौड हिने ५८ धावा खर्च करताना सर्वाधिक सहा विकेट्स घेतल्या. याशिवाय श्री चरणी हिने दोन, तर दीप्तीने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली. क्रांती ही पाच विकेट्सचा डाव साधणारी भारताची दुसरी युवा गोलंदाज ठरली आहे. तिने १८ वर्षे १७९ दिवस वय असताना हा पराक्रम करून दाखवला. या आधी दीप्तीनेही एवढेच वय असताना अशी कामगिरी करून दाखवली होती.

# दिव्या देशमुखची बुद्धिबळ विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत धडक

**बटुमी : वृत्तसंस्था**

भारतीय बुद्धिबळ क्षेत्रात एका ऐतिहासिक क्षणाची नोंद झाली आहे. अनुभवी बुद्धिबळपटू कोनेरू हम्पी हिच्यानंतर युवा ग्रँडमास्टर दिव्या देशमुखनेदेखील फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच दोन भारतीय महिला खेळाडूंनी उपांत्य फेरीत स्थान मिळवले असून ही भारतीय बुद्धिबळासाठी एक अभूतपूर्व कामगिरी मानली जात आहे.

दिव्याने आपल्यापेक्षा उच्च मानांकन असलेल्या अनुभवी सहकारी खेळाडू ग्रँडमास्टर डी. हरिका यांचा टायब्रेकमध्ये २-० असा पराभव केला.



या विजयासह तिने भारतीय बुद्धिबळात नव्या पर्वाची नांदी केली आहे. दोन्ही क्लासिकल डाव बरोबरीत सुटल्यामुळे सामन्याचा निकाल लावण्यासाठी रॅपिड टायब्रेकरचा अवलंब करण्यात आला. या निर्णायक क्षणी अनुभवी हरिका यांच्यावर मोठे दडपण होते, ज्याचा फायदा दिव्याने अचूकपणे उचलला.

दिव्याने अत्यंत निर्धाराने खेळत पहिला डाव जिंकला, ज्यामुळे हरिका हिच्यावरील दडपण अधिकच वाढले. दुसरा डाव जिंकून सामना बरोबरीत सोडवण्याचे आव्हान हरिका समोर होते, मात्र दिव्याने तिला कोणतीही संधी दिली नाही. दुसरा डावही जिंकत दिव्याने हा सामना आपल्या नावे केला आणि उपांत्य फेरीतील आपले स्थान पक्के केले.

स्पर्धेत यापूर्वी कोनेरू हम्पीने उपांत्य फेरी गाठत हा टप्पा गाठणाऱ्या पहिल्या भारतीय महिला खेळाडूचा मान मिळवला होता. ही प्रतिष्ठित स्पर्धा जॉर्जियातील बटुमी येथे आयोजित करण्यात आली आहे.

# वशेणी येथे खुली बुद्धीबळ स्पर्धा रंगणार

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

वशेणी इतिहास संपादकीय मंडळाच्या सातव्या वर्धापन दिनी उरण तालुक्यातील वशेणी येथील राधाकृष्ण मंदिरात १७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धा खुल्या गटासाठी होणार असून वय वर्षे १५पासून पुढे कोणत्याही वयाच्या खेळाडूला सहभागी होता येईल. प्रवेश फी फक्त १०० रुपये राहील. प्रथम येणाऱ्या ३२ खेळाडूंना प्राधान्य देण्यात येईल स्पर्धा ही बाद पद्धतीने होईल. स्पर्धेसाठी येताना सोबत स्वतःचा बुद्धिबळ संच घेऊन यावा.

स्पर्धेत उरण, पेण, पनवेल, कर्जत व अलिबाग तालुक्यातील बुद्धिबळ स्पर्धकांना भाग घेता येईल. प्रवेश घेण्याची अंतिम तारीख १० ऑगस्ट असून बक्षीस वितरण २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता स.रा. पाटील यांच्या वशेणी येथील निवासस्थानी होणार आहे.

प्रथम क्रमांक तीन हजार रुपये, द्वितीय दोन हजार, तृतीय एक हजार रुपये तसेच तिन्ही विजेत्यांना तसेच उत्तेजनार्थ क्रमांकास सन्मानचिन्ह दिले जाईल. सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येईल, अशी माहिती वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कार्यवाह मच्छींद्र म्हात्रे यांनी दिली.

प्रवेश फी भरण्यासाठी संदेश गावंड यांच्याशी संपर्क (९६५७८६५८८४) साधावा, अपवादात्मक परिस्थितीत स्पर्धेच्या नियोजनात, आयोजनात, नियमात बदल करण्याचा अधिकार मंडळाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

# बांगलादेशकडून हरल्यानंतर पाकची रडारड

## म्हणे, खेळपट्टी चांगली नव्हती!

**ढाका : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट संघाला पहिल्या टी-२० सामन्यात बांगलादेशकडून लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानला ११० धावांवर गुंडाळल्यानंतर बांगलादेशने १५.३ षटकांत तीन विकेट्सच्या मोबदल्यात हा सामना जिंकला. पराभवानंतर पाकिस्तानचे प्रशिक्षक माईक हेसन यांनी खेळपट्टीला दोष दिला आहे.

पाकिस्तानचा सलामीवीर फखर जमानने ४४ धावांची खेळी केली. त्यानंतर अब्बास आफ्रिदी (२२) व खुशदील शाह (१७) यांनी दुहेरी धावसंख्या केली. पाकिस्तानचे सात फलंदाज एकेरी धावेवर बाद झाले. त्यांचा संपूर्ण संघ १९.३ षटकांत ११० धावांवर गारद झाला. मुस्तफिजूर रहमानने दोन विकेट्स घेतल्या. बांगलादेशकडून परवेझने ३९ चेंडूत नाबाद ५६ धावांची खेळी केली, तर तौहिद हृदोयने ३६ धावांचे व जाकेर अलीने १५ धावांचे योगदान दिले.



या सामन्यानंतर पत्रकारांशी बोलताना प्रशिक्षक हेसन यांनी ढाकाच्या खेळपट्टीकडे बोट दाखवले. २०२५चा आशिया चषक आणि २०२६च्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेची तयारी करत असताना अशा खेळपट्टीवर खेळायला लागणे हे योग्य नाही. ही खेळपट्टी आंतरराष्ट्रीय दर्जाची नव्हती.

ते पुढे म्हणाले, माझ्या मते ही आदर्श खेळपट्टी नव्हती. संघ आशिया चषक आणि टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या तयारीला लागले आहेत. त्यांना अशा खेळपट्टीवर खेळावे लागतेय याचा स्वीकार केला जाणार नाही. पराभवानंतर मी कारणे देत नाही. आमचेही काही निर्णय चुकले, पण ही खेळपट्टी आंतरराष्ट्रीय दर्जाची नाही.

### बांगलादेशकडून दाव्याचे खंडन

बांगलादेशचा सलामीवीर परवेझ याने हेसन यांच्या मताला उत्तर दिले. तो म्हणाला, आम्हाला तसे वाटत नाही. आम्ही हे लक्ष्य १६ षटकांच्या आत पार केले. आम्ही २० षटके पूर्ण खेळलो असतो, तर १५०-१६० धावा नक्कीच केल्या असत्या. त्यांना खेळपट्टीवर नीट खेळता आले नाही आणि आम्ही त्यांच्यापेक्षा चांगले खेळलो.

# सुयश पवारची वर्ल्ड चॅम्पियनशिप किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्तीसगडमधील रायपूर येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत रायगडच्या सुयश पवार याने ७४ किलो वजनी गटात लाईट कॉन्टॅक्ट या इव्हेंटमध्ये सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या कामगिरीची दखल घेत नोव्हेंबर महिन्यात अबुधाबी (दुबई) येथे होणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी वाको इंडिया किकबॉक्सिंग संघात त्याची निवड झाली आहे.

पनवेल येथील सुयश पवार याला बालपणापासून मार्शल आर्टची आवड होती. यामध्ये त्याने जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेऊन अनेक पदक पटकवलेली आहेत. पुणे हिंजवडी येथे झालेल्या राज्यस्तरीय आणि



छत्तीसगडमध्ये झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सुयशने सुवर्णपदक पटकावले. त्याला पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष व मुख्य प्रशिक्षक निलेश भोसले याचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष परेश ठाकूर, सचिव मंदार पनवेलकर, वाको महाराष्ट्राचे अध्यक्ष निलेश शेलार, सचिव धीरज वाघमारे यांनी अभिनंदन केले व पुढील वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बांगलादेशचा पाकिस्तानवर मालिका विजय

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये टी-२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात बांगलादेशने भेदक गोलंदाजीच्या जोरावर पाकिस्तानचा आठ धावांनी दारूण पराभव केला. यासह बांगलादेशने सुरुवातीचे दोन सामने जिंकत मालिका २-०ने आपल्या नावे केली आहे.

बांगलादेशने संपूर्ण २० षटके खेळली आणि १३३ धावांवर सर्वबाद झाला. टी-२० सामना पाहता पाकिस्तानसाठी हे लक्ष्य सोपे होते, परंतु पाकिस्तान संघ हे लक्ष्य गाठण्यात अपयशी ठरला. संपूर्ण संघ १९.२ षटकांत १२५ धावांवर सर्वबाद झाला. तीन सामन्यांच्या मालिकेत बांगलादेशचा हा सलग दुसरा विजय आहे. त्यांनी २-० अशी अजिंक्य आघाडी घेतली आहे.



पाकिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि बांगलादेशला २० षटकांत १३३ धावांवर सर्वबाद केले. प्रत्युत्तरात पाकिस्तानची सुरुवात लाजिरवाणी झाली. पाकिस्तानचे टॉप-६ फलंदाज १० धावांचा आकडाही पार करू शकले नाही. तीन जण तर शून्यावर बाद झाले. परिणामी पाकिस्तानने अवघ्या १७ धावांवर पाच विकेट्स गमावल्या होत्या, पण फहीम अश्रफ संघासाठी तारणहार ठरला.

फहीम अश्रफने एका टोकाकडून संघाचा डाव उचलून धरत ३२ चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांसह ५१ धावा करत अर्धशतक झळकावले. १९व्या षटकात तो क्लीन बोल्ड झाला आणि पाकिस्तानच्या विजयाचे स्वप्न भंगले. अशरफच्या लढाऊ खेळीनंतरही संघ १९.२ षटकांत १२५ धावांवर सर्वबाद झाला. बांगलादेशच्या गोलंदाजांनी विशेषतः मेहदी हसन, मुस्तफिजूर रहमान आणि शोरीफुल इस्लाम यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि संघाला विजयाकडे नेले.

# इंग्लंडच्या मैदानात हरमनप्रीतने गाठला एक हजार धावांचा टप्पा

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि निर्णायक एकदिवसीय सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. ड्युरॅम काउंटी मधील चेस्टर-ल-स्ट्रीट येथील रिव्हरसाईडच्या मैदानात भारत-इंग्लंड महिला संघातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील तिसरा आणि अखेरचा सामना रंगला.



या सामन्यात इंग्लंडच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीची बॅटर प्रतिका २६ (३३) आणि स्मृती मानधना ४५ (५४) यांची विकेट गमावल्यावर कर्णधार हमनप्रीत कौर फलंदाजीला आली. संघाचा डाव सावरणारी खेळी करताना तिने खास विक्रमाला गवसणी घातली. आधी तिने इंग्लंडच्या मैदानात एक हजार धावांचा टप्पा गाठला. त्यानंतर ३३ धावा करताच तिने वनडेत चार हजार धावांचा पल्लाही पार केला.

इंग्लंडच्या मैदानात एक हजार धावा करणारी हरमनप्रीत कौर ही माजी कर्णधार मिताली राजनंतर दुसरी भारतीय बॅटर ठरली. मितालीने ४१ सामन्यातील ३९ डावात इंग्लंडच्या मैदानात ४८.५९च्या सरासरीसह १५५५ धावा केल्या आहेत. तिच्या पाठोपाठ आता हरमनप्रीत हजारपेक्षा अधिक धावा करणारी दुसरी भारतीय बॅटर आहे. या यादीत पूनम राऊत ७४१ धावांसह तिसऱ्या, तर स्मृती मानधना ७१५ धावांसह चौथ्या स्थानावर आहे.

### वनडेत चार हजार धावाही पूर्ण

इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हरमनप्रीत कौरने ३३ धावा करताच वनडेत चार हजार धावा करण्याचा मोठा पल्लाही पार केला. अशी कामगिरी करणारी ती मिताली राज आणि स्मृती मानधना यांच्यानंतर तिसरी बॅटर ठरलीय. मितालीने आपल्या वनडे कारकिर्दीत ७८०५ धावा केल्या आहेत.

# राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक लोकसभेत सादर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी बुधवारी (दि.२३) लोकसभेत राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ सादर केले. हे विधेयक भारतीय खेळांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि चांगल्या प्रशासनाच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे.

या विधेयकांतर्गत राष्ट्रीय क्रीडा मंडळ (एनएसबी) तयार केले जाईल, ज्याला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय)सह राष्ट्रीय क्रीडा महासंघ (एनएसएफ)वर नियम बनवण्याचे आणि देखरेख करण्याचे व्यापक अधिकार असतील. या विधेयकात राष्ट्रीय क्रीडा महासंघांसाठी जबाबदारी प्रणाली स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com